



# वाईड अँगलमधून



प्रसाद

जोशी

# वाईड अँन्गलमधून

प्रसाद जोशी

ई साहित्य प्रतिष्ठान

# वाईड ॲन्गलमधून

प्रसाद शिवाजीराव जोशी

वय : २८ वर्षे

पत्ता : जुने दत्त मंदीर जवळ, कडतन गल्ली, मानवत
ता. मानवत जि. परभणी महाराष्ट्र ४३१५०५

मोबाईल क्र. : 9860654071

ईमेल : prasadj21@gmail. com

Blog : www. onlineprasadsj. blogspot. in

पत्रकारिता : दैनिक देवगिरी तरुण भारत मध्ये प्रतिनिधी ३ वर्षे कार्यरत
लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स, सकाळ, लोकमत, नागपूर तरुण भारत, पुण्यनगरी, दिव्य मराठी या दैनिकात विविध विषयांवर लेख प्रसिध्द.

राष्ट्रीय साप्ताहिक ओर्गनायझर साठी प्रतिनिधी म्हणून कार्यरत
जुलै २०१४ पासून 'दर्पण' दै. पुण्यनगरी औरंगाबाद आवृत्तीत स्तंभलेखन.

सामाजिक कार्य : विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक व प्रबोधनात्मक उपक्रमात सहभागी.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

©esahity Pratishthan®2014

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

अर्पण पत्रिका

ज्यांचे कायमच आशीर्वाद आहेत ते

## स्व. वेदशास्त्रसंपन्न हरिभाऊ जोशी (बप्पा,आजोबा)

## व स्व.सौ.मिनाक्षी (बहिण)

यांच्या पावन स्मृतीस

आणि

## सदगुरू व माता,पिता

यांचे चरणी अर्पण

प्रसाद जोशी

# प्रकाशकाचे दोन शब्द

प्रसाद जोशी हे नांव खुपच कॉमन आहे. आणि त्यांनी पाठवलेल्या लेखांची शिर्षकं आणि विषयही कॉमन होते. त्यामुळे वाचायला घेण्यापुर्वीच काही पुर्वग्रह निर्माण झाले. तसे वाचकांचे होऊ नयेत म्हणून हे दोन शब्द.

नवनिर्मिती, प्रगती, चैतन्य, आनंदयात्रा, विषमता, समृद्ध, असे शब्द शिर्षकांत आणि विवेकानंद, वारी, धर्माचार्य, राजकारण असे विषय जरी कॉमन असले तरी प्रसादचे विचार मात्र अनकॉमन रस्ता धुंडाळत असतात. त्याच्या प्रत्येक लेखात काही न काही अनोखे, ओरिजिनल विचार आहेत. ते सगळे विचार सगळयांना आवडतील किंवा मान्य होतील हे अशक्य आहे ( इथेच हे सांगून टाकतो की : वैधानिक इशारा: या पुस्तकातील विचारांशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. ) पण नव्या विचारांची हीच तर खरी टेस्ट आहे की सुरुवातीला हास्यास्पद, नंतर अदखलपात्र, आणि नंतर चुकीचे आणि घातक वाटतात. अखेरीला ते हळू हळू पटायला लागतात. प्रसाद स्वतःला पत्रकार म्हणवतो. पण पत्रकारांमध्ये कालांतराने (सर्वच प्रकारच्या बातम्या पाहून) येणारी निबरता आणि सिनिसिझम त्यात नाही. तो खुपच संवेदनाशील आहे. त्याला सामाजिक परिस्थिती पाहून वेदना होतात. आणि त्यामुळे त्याच्या लिखाणात प्रामाणिक कळकळ आहे. ही कळकळ आणि प्रश्नांचे मूळ शोधायची त्याची वृत्ती यातून आपल्याला लवकरच एक सेलेब्रिटी लेखक मिळणार याची आम्हाला खात्री आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान ही एक वैचारिक सामाजिक संस्था असली तरी सर्वच (अगदी वरवर वेडगळ किंवा घातक वाटणाऱ्या) विचारांना व्यासपीठ देऊ इच्छिते. त्यामुळे आम्ही ज्योतिषशास्त्रावरची पुस्तकं आणतो तशीच विज्ञानावरची. आपण कायम आमच्यासोबत रहा आणि नवनव्या विचारांना निदान पहा आणि वाचा तर!

प्रसादचे हे पहिले पुस्तक प्रकाशित करताना आम्हाला आनंद आणि अभिमान वाटतो.

सुनिल सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान टीम

# मनोगत



आपल्या आजूबाजूला घडणा-या घटना,प्रसंगांचे आपण नेहमीच निरीक्षण करत असतो.त्यावर आपली प्रतिक्रिया ही असते.अनेकदा घटना,प्रसंग आपल्याला व्यथित करतात,अस्वस्थ करतात.या सर्वांचा खोलवर परिणाम आपल्या अंतरंगात होत असतो. एक पत्रकार नेहमीच या घटनांचा धांडोळा एका वेगळ्या दृष्टीकोनातून घेत असतो. ज्याला आपण वाईड अॅन्गल असेही म्हणू शकतो. अशाच एका वाईड अॅन्गलमधून घेतलेल्या या नोंदी आहेत. या नोंदींचे पुस्तक प्रसिद्ध केल्याबद्दल ई-साहित्य प्रतिष्ठान चा आयुष्यभर ऋणी राहील.

माझे कुटुंब ग्रामीण भागातील जेमतेम आर्थिक परिस्थितीचे असले तरी आई (सौ.शालिनी) - अप्पा (श्री.शिवाजी) यांनी शिक्षण,इतर छंद याबाबतीत कुठेही उणीव पडू दिली नाही. कै.हरीप्रसादजी काबरा व त्यांचे कुटुंबीय, मा.श्री.बालाकीशनजी चांडक व परिवार यांनी माझ्या कुटुंबाला कायम मायेचा आधार दिला किबहुना आजही देतच आहेत. माझे कुटुंब त्यांच्या कायम ऋणात राहील. ज्येष्ठ बहिण सौ. मनिषा व श्री. गणेशराव देशमुख, सौ.मंजुषा व श्री.दुर्गादासराव उन्हाळे यांचा माझ्या जडणघडणीत मोठाच वाटा आहे. तसेच सौ. उज्वलाकाकू भोसले, श्री.छगन चव्हाण व सौ. विमलबाई लाड हे आमच्या कुटुंबाला रक्ताच्या नात्यापेक्षा कुठेही कमी नाहीत किबहुना यांच्याशी काकणभर जास्तच घट्ट ऋणानुबंध विणले गेले आहेत .

शालेय जीवनापासून वृत्तपत्र वाचनाची आवड निर्माण झाली.पुढे वाचकपत्र लिहायला लागलो,नंतर महाविद्यालयात प्रवेश झाल्यावर एका दैनिक सकाळ चा महाविद्यालयीन प्रतिनिधी म्हणून बातम्या पाठवत असे. पुढे दैनिक देवगिरी तरुण भारत मध्ये प्रतिनिधी म्हणून वृत्तपत्रीय लिखाणाला सुरुवात झाली. प्रा.भगवान टेकाळे सर,हनुमंत चिटणीस सर यांनी सुरुवातीच्या काळात मोलाचे मार्गदर्शन केले. मानवत शहराचे सांस्कृतिक वैभव असणारी व चार दशकाहून अधिक काळ अव्याहतपणे प्रवाहित असणारी शारदोत्सव व्याख्यानमाला आमच्या पिढीसाठी वरदान ठरली. इथली व्याख्याने ऐकून आम्हा तरुणाची वैचारिक बैठक अधिक प्रगल्भ झाली. प्राचार्य डॉ.ओमप्रकाशजी समदाणी सरांशी संवाद म्हणजे वैचारिक मेजवानी असते. त्यांच्या विचारातील प्रगल्भतेने कुणीही सहजच प्रभावित होईल.सरांसोबत विविध सामाजिक उपक्रमात कार्य करण्याची संधी मिळाली.सर नेहमीच मार्गदर्शन करत असतात,प्रोत्साहित करतात.

महाविद्यालयीन शिक्षणानंतर स्व.गोपीनाथजी मुंडे व मा.खा.पूनमदीदी महाजन यांनी मुंबई येथे रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीत काम करण्याची संधी दिली.या ठिकाणी कामातील उत्कृष्टता व नेमकेपणा शिकता

आला. प्रबोधिनीचे महासंचालक डॉ.vinayविनय सहस्रबुद्धे व कार्यकारी संचालक श्री.रवींद्र साठे यांचेकडून खूप काही शिकायला मिळाले. माझ्या आयुष्यात प्रबोधिनी व येथील सहकारी मित्र यांचे स्थान नेहमीच महत्वपूर्ण राहीले आहे. ज्ञानप्रबोधिनी चे कार्य करणारे श्री.प्रसाद चिक्षे यांच्या सहवासातून खूप काही गवसले. त्यांची प्रेरणा दीप स्तंभासारखी आहे.

राष्ट्रीय साप्ताहिक ओर्गनायझर चे संपादक मा.श्री.प्रफुल्लजी केतकर यांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास मला खूप महत्वाची जबाबदारी वाटते. त्यांनी नेहमीच न कंटाळता मला लिखाणातील तंत्र व कौशल्ये सांगितली.

दै.पुण्यनगरी च्या मराठवाडा आवृत्तीमध्ये स्तंभ लिहायला संधी दिल्याबद्दल संपादक श्री.सुशील कुलकर्णी सर व संपादकीय विभागाचे श्री.रमेश नांदेडकर यांचे मन:पूर्वक आभार.

श्री.अभिजितजी ताम्हाणे सर (दै.लोकसत्ता,मुंबई) लेख लिहिण्या संदर्भात अत्यंत महत्वपूर्ण मार्गदर्शन करत असतात. तसेच श्री.राजू परुळेकर, श्री.दिलीप धारूरकर, श्री.प्रवीण बर्दापूरकर, श्री.संजीव उन्हाळे, श्री.राजीव इनामदार (दै.लोकमत,पुणे), श्री.सुनील कुहीकर (दै.तरुण भारत,नागपूर), श्री.मिलिंद आरोलकर (न्यूजभारती वेबपोर्टल), श्री.श्रीकांत उमरीकर (जनशक्ती वाचक चळवळ,औरंगाबाद) , श्री.निरंजन आगाशे (दै.सकाळ,पुणे), श्रीमती प्रिया खान, श्रीमती संध्या लिमये (दै.अग्रोवन,पुणे), श्री.राकेशजी चौधरी, श्री.आशिष चांदोरकर (दै.महाराष्ट्र टाईम्स,पुणे) , श्री.अजय तेलंग(सा.विजयंत,सांगली), श्री.शंकरभाऊ महाजन, डॉ.सचिन चिद्रवार, डॉ.राजकुमारजी लड्डा, मानवत, केशवजी उपाध्ये या सर्वानी वेळोवेळी मार्गदर्शन केले,प्रोत्साहन दिले. पत्रकारितेतील या सर्व अनुभवी व ज्येष्ठ मार्गदर्शकांचा आभारी आहे

जगातले सर्वात नितांतसुंदर असे नाते म्हणजे मित्रत्व. याबाबतीत मी खूपच श्रीमंत आहे. त्यांचे आभार मानणे त्यांना आवडणार नाही. आयुष्याचा विविध टप्प्यावर यांची सोबत होती म्हणून अनेक कठीण प्रसंगाना सहजतेने सामोरे जाता आले. वेगवेगळया सामाजिक उपक्रमात सहभागी होण्याबाबत, आयोजन करण्याबाबत मी हक्काने तुम्हाला त्रास देतो आणि तुम्हीही मोठ्या उत्साहाने सहभागी होता. तुम्हा सर्वांच्या व्यक्तिमत्वामध्ये असलेला मैत्रीचा ओलावा माझ्यासाठी जीवनदायी शक्ती आहे. मित्रहो, तुम्ही अक्षयी उर्जा आहात.

सर्वांचे खूप धन्यवाद.

प्रसाद शिवाजीराव जोशी

# ललित

आजपर्यंत अंत:करणातील वेदनेला डोळ्यांपर्यंत कसे जायचे याचा रस्ता सापडू दिला नव्हता. कारण वेदनेला हृदयाशी कवटाळले होते. श्वासांची प्रचंड घुसमट व्हायची खरी, पण एकदा वेदनेला आपलेसे केल्यावर तिला हृदयापासून दूर करणे जमले नाही.माझा अविचल भाव बघून श्वासाला सुद्धा वेदनेची सवय झाली.

अनेकदा मित्र विचारत होते एकटा बसून काय विचार करतो आहेस..
मी हसायचो कारण मी एकटा कुठे होतो ?
माझ्यासोबत वेदना होती ना.......
आम्ही दोघे अनेक वेळ गप्पा मारायचो..

मी तिला एकदा विचारले, काय ग माझ्याकडे आलीस तरी कशी?
तिने करुनायुक्त शब्दांनी सांगितले की, मला नियतीने शिक्षा दिली आहे.
मी सगळ्याना नकोशी आहे. कोणाकडे गेले की त्याला त्रास होतो.
मग मला घालवून देण्यासाठी प्रत्येकजण खूप प्रयत्न करतो.
मला ते बघवत नाही
शेवटी डोळ्याच्या मार्गे अश्रू च्या सोबतीने मी निघून जाण्याचा प्रयत्न करते.

खरेतर मला लपून बसायला आवडते.
मला माहित होते की, तुझ्याकडे आल्यावर
तुझ्या हृदयात तू मला कुणाचीही नजर न पडता
सांभाळून ठेवशील...

मी क्षणभर गप्प झालो आणि थोडे बरे सुध्दा वाटले

चला कोणीतरी आपला आहे....
कोणालातरी माझ्यावर विश्वास वाटतोय...
या भावनेने छान वाटले....

मी म्हणालो, आपले सगळे सेमच आहे म्हणूनच आपली मैत्री जमली..

हे वाक्य संपताक्षणीच हिरमुसून जावून वेदनेने सांगितले
'पण तुला मी लवकरच सोडून जाणार आहे.'

मी म्हणालो ' का ?'

तिने सांगितले 'माझे काम आता संपले आहे. '

माझे अस्तित्व जगणे शिकवते, फुलणे शिकवते.
आयुष्याला अर्थ प्राप्त करायला शिकवते.
माझ्या अस्तित्वाने अंत: करणात संवेदनेचे रोप लावले जाते.

तू माझ्यासोबत राहून हसायाला शिकलास
माझ्या जिवलग मित्रा माझ्या अस्तित्वाने हे कार्य संपन्न झाले आहे.
आता मी जास्त काळ इथे राहू शकत नाही.

मी काही म्हणायच्या आत वेदनेनी आपली वाट शोधली आणि अश्रूंचा प्रवाह वेगाने अंत:करणा पर्यंत आला. जणू काही वेदनेनी लावलेल्या संवेदनेच्या रोपट्याला जगवण्याच्या वसा आता अश्रुंनी घेतला आहे.

# ध्यास नवनिर्मितीचा

सृष्टीमध्ये अस्तित्वात असलेल्या प्रत्येक प्राणीमात्रामध्ये नवनिर्मिती हा एक समान गुणधर्म आढळतो. नवनिर्माणाकडे असलेली ओढ याची साक्ष देते. जगण्याचा लढा देत, अनंत अडचणींचा सामना करत जगणे फुलवणे ही नवनिर्मितीची अविकसित शक्तीच होय. अर्थात केवळ जगणे म्हणजेच काही नवनिर्मिती नव्हे, तर आपल्या अस्तित्वाला एक वेगळा अर्थ निर्माण करणे. स्वत:च्या कोशात न रमता इतरांच्या आयुष्यातील दु:ख वेदना कमी करण्यासाठी निमित्त होणे. ज्यांनी अशाप्रकारे आपल्या नवनिर्मितीच्या शक्तीचा म्हणजेच सृजन शक्तीचा विकास केला आहे त्यांची आयुष्यं इतरांसाठी आधार ठरली, सामान्यांच्या जगण्याला कलाटणी देणारी ठरली किंबहुना ठरत आहेत. आपल्या भोवतीच्या प्रचंड नकारात्मक वातावरणात त्यांनी सकारात्मक बदल घडवले. दुर्दम्य आशावाद, प्रबळ इच्छाशक्ती व प्रयत्नातील सातत्य ही या सृजन शक्तीची बलस्थाने. या तीनही गुणांचा समुच्चय एकाच ठिकाणी दुर्मिळतेने पाहायला मिळतो. म्हणजे समाजात चांगल्या घटना घडाव्या असे सगळयानांच वाटते, परंतु त्यासाठी फार थोडे लोक प्रयत्न करतात. एखाद्याने प्रयत्न करण्यास सुरुवात केली तरी मार्गातील अडथळयाना तोंड देत प्रयत्न सोडुन दिले जातात. परंतु मोजकेच व्यक्तिमत्वे प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर संकटांचा धैर्याने सामना करत सृजनाचा नवा अध्याय निर्माण करतात.

कुठल्याही संवेदनाक्षम मनाला व्यथित व अस्वस्थ करेल अशी समाजाची सध्याची परिस्थिती आहे. काही प्रसंगी सृजनाचे तर सोडाच, व्यक्तीच्या माणूसपणाच्या अस्तित्वावरच शंका यावी इथपर्यंत परिस्थिती बिघडली आहे असे भासू लागते. अशा परिस्थितीत सृजनाचे कार्य करणाऱ्याने कितीही सकारात्मक विचार केला तरी एखाद्या प्रसंगी नैराश्य येणे साहजिकच आहे. दररोजच घडणारे बलात्कार, खून, आर्थिक फसवणूक यासारखे गुन्हे समाजाची वाटचाल मूल्यहीन व अराजकसदृश्य दिशेने जात आहे असेही प्रत्ययास येऊ शकते. विकासाच्या आधुनिक संकल्पना

पैसा, प्रतिष्ठा व सोयी सुविधा अशा चित्ताकर्षक घटकांपुरत्या झाल्याने सृजनाचा मार्ग रुक्ष, निरुपयोगी वाटु लागण्याचे क्षणही येतील. परंतु समाजहिताची तळमळ व ध्येयाप्रती असलेली प्रामाणिकता सृजनाचा दीप विझू देणार नाही.

अशी सृजनशक्ती विकसित झालेले नागरिक देशाच्या उज्ज्वल भवितव्याचे आधारस्तंभ आहेत. याकरिता प्रत्येकाने स्वत:मधील असलेली सृजनशक्ती विकसित करून समाजहितासाठी, राष्ट्र बांधणीसाठी स्वताचे योगदान देणे ही देशाची सर्वात मोठी गरज आहे. आपल्यामधील प्रत्येकाला केव्हा तरी असे वाटलेलेच असते की समाज व राष्ट्रहितासाठी आपण काहीतरी केले पाहिजे. परंतु या भावनेला आपण न्याय देत नाही. हा आतला आवाज आपण ऐकत नाही. त्याची कारणे वेगवेगळी शकतील परंतु हा आवाज जर आपण ऐकला व काही निश्चित दिशा ठरवून सकारात्मक बदल घडवण्यासाठी प्रयत्न केले तर नक्कीच परिस्थितीत बदलाची सुरुवात होऊ शकेल व आपल्या अस्तित्वाला एक नवा अर्थ प्राप्त होऊ शकेल. आपल्या असण्याने एखाद्याच्या वेदना, दुःख कमी होत असले तर यापेक्षा वेगळी सृजनशक्ती ती काय असू शकेल?

समाजातील बुध्दिवंत वर्गाने जाणीवपूर्वक समाजासाठी आक्षेपार्ह असणाऱ्या घटकाविरुध्द बोलले पाहिजे व विधायक गोष्टींचा पुरस्कार केला पाहिजे. या वर्गाचे शांत बसणे, निष्क्रिय राहणे समाजासाठी अत्यंत धोकादायक आहे. सामान्य नागरिक प्रगल्भ व्हायचा असेल तर त्याची वैचारिक बैठक मजबूत होणे गरजेचे असते म्हणून प्रबोधनपर्वाचे पालकत्व या वर्गाकडे नैसर्गिकतेने येते.

इथला सामान्य नागरिक प्रगल्भ झाला तरच समाजाचा, राष्ट्राचा खरा विकास होऊ शकेल. समाजातील व्यक्तींची मने बधिर व संवेदनाशून्य होणे हे सामाजिक आरोग्य बिघडल्याचे

लक्षण आहे. संवेदनाक्षम मन असलेला व्यक्ती स्वत:ला सुख मिळवण्यासाठी इतराना दुःख देत नाही, व त्याहीपुढे जाऊन स्वत:च्या सुखाचा त्याग करून इतरांची दुःखे दूर करण्याचा प्रयत्न करू लागतो. मने संवेदनाक्षम होण्यासाठी समाजात मोठया प्रमाणावर प्रबोधनाची गरज आहे. परस्परांत संवाद होण्याची नितांत आवश्यकता आहे. याकरिता समाजातील बुद्धिवंत वर्गाने पुढाकार घेण्याची गरज आहे. त्यासाठी स्वत: एक उत्कृष्ट संयोजक होणे गरजेचे आहे. 'विधायक कार्य व्हावे' या व्यक्तिगत पातळीवर असलेल्या इच्छेला सामुहिक स्वरूप देऊन प्रत्यक्ष कार्यात त्याचे रुपांतर झाले पाहिजे.

आपले पुढाकाराचे एक पाउल इतराना प्रेरक ठरून त्यानाही सृजन शक्ती विकसित करण्याची संधी उपलब्ध करून देउ शकते. कारण केवळ उदरनिर्वाहासाठी जगणे ही आपली भारतीय संस्कृती नाही, तर ' शिवभावे जीवसेवा ' हा आपल्या संस्कृतीचा मूलमंत्र आहे. ज्यायोगे स्वत:चे आयुष्यात दिव्यता निर्माण होऊ शकेल. ज्याक्षणी आपले हात समाजातील जणांचे, शोषितांचे दुःख दूर करण्यासाठी प्रवृत्त होतील तो क्षण आपल्यामधल्या सृजन शक्तीच्या विकासाचा आरंभ बिंदू व इतिहासाचे एक नवे पान लिहिण्याची सुरुवात असेल यात शंका नाही.

(हा लेख, रविवार दि. १९/०७/२०१४ रोजी दैनिक पुण्यनगरीच्या मराठवाडा आवृत्तीत प्रसिध्द झालेला आहे. )

# प्रगतीच्या वाटा

अनादि काळापासून ब्रह्मांडाचे रहाटगाडगे अविरतपणे चालू आहे. काळाचा महिमा अगाध आहे. प्रगतीच्या दिशेने अधिकाधिक टप्पे पार करत आहे. वैज्ञानिक संशोधनाने अनेकानेक सोई सुविधा उपलब्ध होत आहेत. एकूणच अत्याधुनिक जीवन शैलीने प्रगतीचा व्यावहारिक टप्पा निश्चितच गाठला आहे. परंतु, मानवाची प्रगती केवळ सोयी-सुविधा वाढवण्यासाठी संपत्ती निर्माण करून परिपूर्ण होईल असा समज पक्का होत आहे. अर्थात, संपत्ती निर्माण हे एक मोठेच सामाजिक कुकृत्य आहे असे नव्हे, तर प्रगतीचा हा एक भाग आहे व स्वतःच्या अस्तित्वाला काही एक अर्थ निर्माण झाल्यास, आपल्या व्यक्तिमत्वाचा खऱ्या अर्थाने विकास झाला तरच प्रगतीला परिपूर्णता येऊ शकेल. रवीन्द्रनाथ टागोर म्हणतात ' भावभावनांचे क्षेत्र व्यापक होणे यात खरी प्रगती आहे '. आपण हे जाणतो की, उत्तरोत्तर व्यक्तीच्या भावनांचे क्षेत्र संकुचित होत चालले आहे. संवेदना बधिर होत चालल्या आहेत. व्यावहारिक सोयी- सुविधा हे आनंद मिळवण्या चे प्रमुख साधन बनले आहे. मग यासाठी संपत्ती निर्माण करण्याची अहोरात्र धडपड चालू असते. अशा परिस्थितीत आपल्या संवेदना, भावभावनांचे क्षेत्र आखुडले जात आहे. याकडे आपले लक्ष नसते. परिणामी व्यावहारिक सोयी-सुविधा व संपत्ती निर्माणाचे विविध टप्पे प्राप्त करूनही एक अस्वस्थता कायम राहते. साधन हे साध्य बनल्यामुळे अखंड धावूनही हाती काहीच लागत नाही. थोडक्यात असे म्हणता येईल की आयुष्य हे रिकामे वाटु लागते.

खरेतर भारतीय संस्कृतीत असणारे साहित्य, उपासना पध्दती या व्यक्तीच्या भावभावनांचे क्षेत्र व्यापक होण्यासाठी आहेत. आध्यात्मिकतेचा मुळ गाभा याच ध्येयावर उभा आहे. भावनांचे क्षेत्र विस्तारले की दृष्टी व्यापक होते. त्यामुळे आनंद, समाधान मिळवण्यासाठी कुठल्याही

बाह्य गोष्टीवर अवलंबून राहण्याची गरज उरत नाही. आध्यात्मिकतेच्या साधनांनी व्यक्ती अंतर्मुख झाली की आनंदाचा झरा आतच सापडतो. त्यात अंतकरण मनसोक्त भिजले की निस्तेज संवेदना प्रफुल्लीत होतात. अशी व्यक्ती आसपासच्या वातावरणात ही आपल्या अस्तित्वाने सुगंध दरवळू लागते. विविध परीतापांच्या अग्नीत शिणलेल्या जीवासोबत क्षणभर आनंदाची उधळण केली असता त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले तृप्तीचे भाव जगण्याला समृद्धता देतात.

काही दिवसांपूर्वी हिंदीतील प्रसिद्ध कवी अशोक चक्रधर यांच्या फेसबुक वोल वरचा एक स्टेटस हृदय पिळवटून टाकणारा होता.

'मैने रीक्षेवालेसे पुछा भाई पैर को क्या हुआ, जखम बडी दिखा रही है ।

उसने बोला 'भाई साहब ' रिक्षा पैर से नही, पेट से चलता है। '

जगण्याची ही रोजची लढाई किती दाहक आहे. अशा वेळी आपले दोन शब्द त्यांच्या आयुष्यात आनंदाचा शिडकावा करू शकतात. समाधानाचे खरे सूत्र निरपेक्षपणे आनंद देण्यात आहे. आपण अंतर्मुख होण्यासाठी स्वतःच्या आयुष्यात थोडे डोकावून बघायला हवे. आपण दैनंदिन करत असलेल्या कामापैकी अशी किती कामे आहेत ज्यात आपण एखाद्याला निरपेक्षपणे मदत केली, एखाद्या चे दुःख, अडचण दूर करण्यासाठी प्रयत्न केले. फार काही नाही जमले तर किमान जेवण करत वेळेस कोणीही उपाशी राहू नये अशी प्रार्थना करू शकतो. या कृती ने खरेतर आपल्यालाच विलक्षण आनंदाचा, अक्षय समाधानाचा ठेवा मिळणार आहे. या कृती आपल्याला ' मी आणि माझा ' ही गाठ सोडवण्यास मदत करतात. ज्यामुळे अंतःकरण विशाल होऊ लागेल. व वसुधैव कुटुम्बकम ही भारतीय संस्कृतीतील उदात्त कल्पना आपण जगायला शिकू. या संस्कृतीत या विचार प्रवाहांचा अखंड प्रवाह चालू आहे. या प्रवाहातील चैतन्या मुळे साऱ्या विश्वातील प्रज्ञावान भारत भूमीकडे

आकर्षिले जातात. इथल्या मातीत एक अशी विलक्षण शक्ती आहे ज्यामुळे व्यक्तीच्या आयुष्यात कितीही आधिभौतिक, आधिदैविक संकटे आली तरीही नैराश्यग्रस्त होऊन कुढत बसत नाही. कुठल्याही शाळेत न शिकवता येणारी जीवन जगण्याची कला इथल्या सामान्य व्यक्तीला सहजीवनातून अवगत होते. याकरिता सहजीवन, संवाद या बाबी आपल्या आयुष्यातून कमी होता कामा नयेत. तरच आपण प्रगतीचा हा दुसरा टप्पा प्राप्त करू शकू. भावनांचे क्षेत्र विस्तारले गेले तरच आपण संत ज्ञानेश्वरांच्या पसायदानाचे मर्म जाणून घेऊ शकू. पुढील ओळी कोणाच्या आहेत माहित नाही. पण त्याना खूप धन्यवाद.

खुशिया बटोरते बटोरते उमर गुजर गई पर खुश ना हो सके

एक दिन अहसास हुआ

खुश तो वो लोग थे जो खुशिया बाट रहे थे।

(दर्पण, साप्ताहिक स्तंभ, दै. पुण्यनगरी )

# प्रवाह चैतन्याचा. .

महाराष्ट्र हा शब्द उच्चारला, की डोळ्यांसमोर गणेशोत्सव व पंढरपूरच्या वारीचे चित्र उभे राहते. वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राच्या लोकजीवनाचे अभिन्न अंग आहे व त्याचे मुख्य सूत्र वारी हे आहे. सीगल या समुद्रपक्ष्याची कथा आपल्यापैकी बहुतेकांना ज्ञात असेल. हा समुद्रपक्षी केवळ अन्नाच्या शोधार्थ न भटकता उंच भरारी घेण्याची कला अत्यंत कष्टाने शिकतो व त्या अगम्य प्रदेशात विहार करतो; परंतु इतर समुद्रपक्ष्यांना ही कला यावी याकरता तो परत आपल्या मूळ ठिकाणी येतो व त्यांना ही कला शिकवू लागतो. अर्थातच, त्याला प्रवाहाच्या विरुद्ध जावे लागते; परंतु अत्यंत निष्ठेने तो हे काम करत राहतो. वारकरी संप्रदायात होऊन गेलेले संत हे खऱ्या अर्थाने सीगलच आहेत. ज्यांनी यातना सहन करून सामान्य जनांच्या जीवनात दिव्यत्व येण्यासाठी आयुष्य वेचले. या संतांनी वारकरी संप्रदायाची निर्मिती करून एका विलक्षण जगाची ओळख त्यांना करून दिली व प्रपंचात राहून आयुष्याचे मर्म समजून घेण्यासाठी जीवन जगण्याची कला शिकवली.

व्यक्तीचे आयुष्य समाधानी-सुखी होण्यासाठी ते प्रवाही असले पाहिजे; परंतु आपल्या सुखाच्या- समाधानाच्या संकल्पना बदलल्या गेल्याने हा प्रवाह अनेक ठिकाणी थांबतो व त्याचे रूपांतर डबक्यात होते आणि अर्थातच या डबक्यातून दुर्गंधी निर्माण होत. अशा व्यक्ती स्वत:ला व इतरांनाही नकोशा होत जातात. नैराश्य व मानसिक ताणतणाव आयुष्याच्या प्रवाहाचे डबके करतो. या पार्श्वभूमीवर वारीमध्ये असे कोणते आकर्षण आहे, की ज्यामुळे इतक्या मोठ्या प्रमाणावर लोकसमूह त्याकडे आकृष्ट होतो? सांसारिक विवंचना त्रस्त करत असतानाही अशी कोणती उमेद आहे, जी सामान्य जनाला वारीकडे खेचून नेते? या प्रश्नाचे उत्तर शोधताना आपल्याला असे आढळून येईल, की वारी ही केवळ एक परंपरा नसून, तो एक चैतन्याचा प्रवाह आहे. त्याच्यात मनसोक्त डुंबणाऱ्याचे आयुष्य प्रवाही होते. वारीत सामील झालेल्या व्यक्तीला दिव्य आयुष्याची प्रचिती येते व त्या व्यक्तीचे अंतरंग समृद्ध होते. मागणे स्वत:पुरते न राहता व्यापक होते. निरपेक्षतेने कर्म केल्याने अंतरंग समृद्ध होते, हे आपण जाणतो; परंतु निरपेक्ष देणे सध्याच्या व्यावहारिक जगात फारच क्वचित

स्वरूपात दिसते आहे. अतिशयोक्ती वाटू नये; परंतु अनेक ठिकाणी तर चांगल्या कामाचे कौतुक करताना, कृतज्ञता व्यक्त करतानासुद्धा माणसे संकुचित मनोवृत्ती ठेवतात. हल्ली सेवा करणे म्हणजे वृत्तपत्रात प्रसिद्धी अथवा मानसन्मान, असे हिशोब मांडले जातात; पण वारीमधून निरपेक्ष सेवा करण्याची शिकवण मिळते.

व्यक्तीमध्ये असलेले माणूसपण उत्तरोत्तर कमी होत जाणे ही समाजाची सर्वांत मोठी हानी आहे. त्यामुळेच महिलांवरील अत्याचार व आर्थिक शोषण वाढले आहे. ही हानी झाली नसती, तर स्वत:च्या सुखासाठी इतरांना त्रास झाला, तरी त्याची तमा न बाळगण्याची व बघ्याची वृत्ती वाढली नसती. वारीमध्ये माणूसपण जपले जाते. वैष्णव जन तो तेणे कहिये, पीड पराई जाणे रे या उक्तीचे प्रत्यक्ष आचरण वारीमध्ये पाहावयास मिळते. वारी व्यक्तीला मी व माझे या विवरातून बाहेर काढते. अनेक सांसारिक दु:खे असूनही वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान असते. याचे गमक वारकरी संप्रदायाच्या ऊर्जा स्रोतामध्ये आहे. ज्ञानदेवे रचिला पाया तुका झालासे कळस अशा या वारकरी संप्रदायातील संत मंडळींनी आपल्या आचरणाने जो आदर्श निर्माण केला आहे, तो आजही अनेकांना दिव्यत्वाची प्रचिती देत आहे. सध्या संत या संकल्पनेचाही बाजार भरलेला दिसतो आहे. वास्तविक संत म्हणजे ऐसी कळवळ्याची जाती करी लाभाविण प्रीती. हा कळवळा कोणाचा? तर सामान्य जनांचा. जे प्रापंचिक विवंचनेत दु:खी, कष्टी होत आहेत, ज्यांना मनुष्यजन्माचे सार्थक कशामध्ये आहे, याची जाणीव नाही, त्यांचा. संत तुकाराम म्हणतात, की बुडते हे जन न देखावे डोळा. मग आयुष्य सार्थकी होण्यासाठी काय पाहिजे, याचे निरुपण संतांनी त्यांच्या ग्रंथांतून केले आहे. त्यांनी दाखावलेला भक्तीचा मार्ग हिच खरी वारकरी संप्रदायाची संपत्ती आहे.

आपले सद्भाग्य, की अजून आपल्याकडे चमत्कार दाखवा आणि संतपद मिळवा अशी योजना निर्माण झाली नाही. अन्यथा, संतत्वाचे महत्त्वाकांक्षी आणि त्यांचे स्तुतिपाठक यांनी अध्यात्माच्या क्षेत्रात दहशतवाद माजवला असता. संतत्व म्हणजे एखाद्याच्या व्यक्तिमत्त्वात सकारात्मकदृष्टीने बदल घडवता येण्याची क्षमता. अर्थातच, ही क्षमता तपश्चर्येतून येते. ही तपश्चर्या

म्हणजे समाजहित करताना अनुभवास येणारे विविध अप्रिय प्रसंग. अपमान, अपेक्षाभंग अशा अनेक प्रसंगांत मानसिक स्थितीची सत्त्वपरीक्षा बघणाऱ्या कसोट्यांमधून यशस्वी रीतीने बाहेर पडणे. ही प्रक्रिया व्यक्तीमध्ये अंतर्गत क्षमता विकसित करते व त्यानंतरच एखाद्या व्यक्तीच्या अंतरंगात आमूलाग्र बदल घडवण्याची क्षमता निर्माण होते. संत चरित्राच्या विविध दृष्टांतातून ही बाब प्रकर्षाने आपल्या निदर्शनास येते. या कसोटीवर अनेक संत परंपरा वारकरी संप्रदायात दृष्टिपथास येतात. संत ज्ञानदेव व भावंडे, संत एकनाथ, संत नामदेव, संत तुकाराम, संत चोखामेळा, संत दामाजीपंत असे परोपकारी, वारकरी संप्रदायाचे आदर्श आहेत.

जी मूल्ये आपण सहजतेने शिकतो, ती आपल्या व्यक्तिमत्त्वात भक्कमपणे रुजतात. याउलट जबरदस्तीने शिकवलेले आपण विसरून जातो. आपल्या अंतरंगावर त्याचा काहीच परिणाम होत नाही. वारीमध्ये नैतिक मूल्यांची शिकवण सहजतेने आपल्या व्यक्तिमत्त्वामध्ये रुजते. समाजात वावरताना व्यक्तीने व्यक्तीशी कशा पद्धतीने वागले पाहिजे, याची आदर्श शिकवण आपल्याला वारीतून मिळते. प्रत्येकाने आपले आयुष्य प्रवाही ठेण्यासाठी काही मूल्ये बाळगून, कुठलीही तडजोड न करता आचरणात आणली पाहिजेत, तरच अव्यक्त स्वरूपातील पांडुरंगाची भेट होऊ शकेल. वारी आपल्या व्यक्तिमत्त्वाला वेगळाच आकार देते, त्यामुळे आपण कुठल्याही प्रसंगात न डगमगता परिस्थितीला सर्मथपणे तोंड देण्याची क्षमता आपल्यात निर्माण होते. म्हणून वारीचा हा प्रवाह चैतन्याचा आहे, ज्यामध्ये प्रत्येकाचे आयुष्य प्रवाही करण्याची क्षमता आहे. म्हणूनच वारीचा हा चैतन्यरूपी प्रवाह अव्याहतपणे चालूच आहे.

(हा लेख बुधवार, दि. ९ जुलै २०१४ रोजी दैनिक लोकमत मध्ये संपादकीय पानावर प्रसिध्द झालेला आहे. )

# वारी : स्वान्त सुखाची आनंदयात्रा

जय जय विठ्ठल रुखमाई म्हणत पखवाजावर थाप पडली की मन आपोआप त्या मधुर भजनाकडे आकर्षिले जाते. आपल्याही नकळत भूतकाळातल्या त्रासदायक आठवणींच्या गाठी आणि भविष्यातील चिंतेने म्लान झालेला चेहरा एका विलक्षण तेजाने उजळुन निघतो. असे हे मंगलमय वातावरण दिसले की आषाढी एकादशी आली असे निश्चितपणे जाणावे. वारकरी आणि पंढरीची वारी हे जणू महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनाचा श्वासच. गळयात तुळशीमाळ, कपाळी बुक्का, डोक्यावर टोपी आणि खांद्यावर भागवत धर्माची भगवी पताका अश्या बाह्य आभूषणाने शोभिवंत झालेला वारकरी जीवनाचा एका अदभूत वाटेवर मार्गक्रमण करत असतो. या सर्व बाह्य आभूषणा पलिकडे एक अंतस्थ चैतन्य कृतार्थतेचा, अनुपम समाधानाचा अनुभव घेत असते. ते चैतन्य आपल्या सनातन आधाराला भेटण्यासाठी वर्षभर आसुसलेले असते. राम कृष्ण हरी हा मंत्र जपत असताना त्या परम चैतन्याचे नित्य स्मरण करत असते. अध्यात्म हे केवळ प्रत्यक्ष आचरणाचा विषय आहे हि शिकवण संतानी रचलेल्या अभंगातून शिकून तो जगत असतो. त्याचा भक्तियोग

जे जे भेटे भूत ते ते जाणिजे भगवंत

हाच भक्तियोग निश्चित जाण माझा

याप्रमाणे असतो. आपल्या क्षणोक्षणी दांभिकता, फसवणूक यांच्या वादळाशी सामना करत असताना पांडुरंगावर निस्सिम विश्वास टाकून आपल्या प्रामाणिकपणाची ज्योत तेवत ठेवतो. कित्येकदा मन बधिर व्हावे असे अनुभव आप्त स्वकियांच्या तर्हेवाईक वागण्याने येतात, प्रपंचाचे चटके बसत असतात तरीही विठ्ठलावर असणारा विश्वास जराही कमी होत नाही. मनातील

संवेदनशीलता नष्ट होत नाही. वारकरी प्रारब्धभोग म्हणून त्याकडे पाहतो आणि फक्त सहन करतो. व्यावहारिक अनुभवांनी त्याच्या मनात कुठलेही विक्षेप निर्माण होता नाहीत. कर्म करत राहाणे माझे काम आहे बाकी आपला सारा भार तो विठ्ठलावर सोपवून स्वस्थ असतो. म्हणून वारकरी हा खरोखर कर्मयोगीच.

कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी असे म्हणताना

आपले व्यावहारीक कर्तव्य हीच ईश्वराची सेवा आहे अशी त्याची पक्की समजूत असते. त्यामुळे तो आपल्या कर्तव्यात कधी चुकत नाही. असा हा वारकरी आणि भागवत धर्म अत्यंत साध्या सोप्या पध्दतीने सामान्य जनांना भक्तीचा मार्ग दाखवत आहे. या भागवत धर्माचा पाया रचणारे संतश्रेठ ज्ञानेश्वर माऊली आणि तीन भावंडे यांनी समाजाच्या उपेक्षा, अतोनात हाल, सहन केली. या दिव्य बालकांचे मागणेही दिव्यच. पसायदानातील मागणे हे जगाच्या कल्याणासाठी. भागवत धर्माची पताका अवघ्या भुमंडळात डौलाने फडकत आहे कारण संतानी आपल्या आचरणातून शिकवण दिली. तसेच गहन असलेले शास्त्रज्ञान अभंगाच्या माध्यमातून सहज सोप्या भाषेत उपलब्ध समाजाच्या शेवटच्या स्तरातील जीवाला करून दिले. मनुष्यत्वाचा संपूर्ण विकास भागवत धर्माच्या या शिकवणुकीने झालेला आढळतो. समर्पित भावना हा वाराकार्यातील वारकऱ्यामध्ये असणारा स्थायी गुण. विशेष उल्लेख याच्यासाठी कि हि समर्पित भावना कुठल्याही व्यावहारिक फायद्यासाठी नाही. तर केवळ आंतरिक समाधानासाठी. पैसा कमवण्यापलिकडे काही काही काही विलक्षण असे जगणे आहे. आणि त्याचाच अनुभव या वारीतील प्रत्येक जन घेतो. राम कृष्ण हरी जपत, विठ्ठल-विठ्ठल म्हणत उडी मारताना मन पुन्हा तरुण होते.

सहजीवन हा वारीचा सर्वात महत्वाचा गुणधर्म. आज कित्येक जण काम करताना टीमचा सदस्य होता न आल्याने नैराश्यग्रस्त होतात. वातावरणाशी जुळवून न घेता आल्याने काम उरकणे हीच भावना असते. वारीत मात्र प्रत्येक जण आपल्या सहकाऱ्याशी अत्यंत प्रेमाने व्यवहार

करताना दिसतात. 'माउली ' अशी हाक मारतात. 'एकमेका साह्य करू अवघे धरू सुपंथ ' या रीतीने सर्व वातावरण उत्साहमय असते.

वारकरी संप्रदायात समानता ठायी ठायी दिसून येते. गरीब-श्रीमंत, उच्च नीच, पुरुष -महिला असा कुठलाही भेद दिसत नाही. म्हणूनच तर समाजाने वाळीत टाकलेली अनाथ चार भावंडे या संप्रदायाचा आधार झाली, संत तुकारामांचे अभंग लाखो लोकांच्याही वाणीत नित्य येऊ लागतात, नाथ महाराजांच्या चरित्रातून सारे भेदभाव अव्यावहारिक असल्याचा संदेश मिळतो. संत चोखामेळा, संत सावता, संत जनाबाई यांनी दाखवलेल्या भक्तिपंथाचा मार्ग अनुसरून लाखो वारकरी परमार्थ साधत आहेत. कदाचित यामुळेच वारकऱ्याला कोणीही बोलावणे पाठवत नाही की निमंत्रण देत नाही तरीही आंतरिक ओढीने पाय पंढरपूर कडे चालत जातात. वाणी राम कृष्ण हरी जपत जाते. डोळे विठ्ठल दर्शनासाठी आसुसलेले असतात.

सामान्य जणांना अत्यंत सहज सोप्या साधनांनी जीवनाची कृतार्थता प्राप्त करून देणारा हा वारकरी संप्रदाय खरोखरच विलक्षण आहे आणि वारी ही तर महाराष्ट्राचे वैभव बनली आहे. जीवा-शिवाच्या भेटीच्या या सोहळयात या आनंद यात्रेत प्रत्येकाला स्वतःच्या आतील पांडूरंगाचे दर्शन घडावे हीच विठ्ठलाकडे प्रार्थना.

(हा लेख दैनिक लोकमतच्या मंथन पुरवणीत प्रसिद्ध झालेला आहे. )

# सर्व प्रश्नाचे मूळ : आर्थिक विषमता

भारतीय समाजात अथवा या देशात बहुसंख्य असणाऱ्या हिंदू समाजात चातुर्वर्ण्य व्यवस्था नसती तर कदाचित आज आपण ज्या प्रगत अवस्थेत आहोत त्याच्या कितीतरी पटीने अधिक प्रगत असतो. माणुसकीला मुठमाती देऊन उच्चवर्णीय दलित समाजाचे शोषण करता होता. धर्माचा मूळ गाभा व्यावहारिक हिताने झाकून गेला. 'वसुधैव कुटुंबकम', सर्वेपि सुखिन: संतु असे केवळ व्यक्तिगत स्वार्थापायी उच्चारले जाऊ लागले. प्रत्यक्ष व्यवहार मात्र याच्या अगदी विरुद्ध होत होता. परिणामी समाजाचे मोठ्या प्रमाणावर विघटन झाले आणि राष्ट्र अशक्त, गुलाम बनले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अन्य समाजसुधारकांनी या परिस्थितीशी लढा देत सामाजिक अभिसरण घडवून आणले व दलित समाजाला न्याय मिळवून दिला. स्वातंत्र्यानंतर आपल्या राज्यघटनेने अधिकृतरित्या चातुर्वर्ण्य व्यवस्था नष्ट करून सर्वांना समान दर्जा देण्यात आला तसेच वर्षानुवर्षापासून मागास असलेल्या वर्गांना समान स्तरावर आणण्यासाठी जातीय आरक्षण देण्यात आले. ज्या व्यक्तीसमुहास स्वत:ची आर्थिक सामाजिक उन्नती करण्याची संधी नाकारण्यात आली त्यांच्यासाठी आरक्षण हे लाभदायी ठरले मात्र त्याचा मुख्य हेतू जाती अंताचा होता. 'कोणत्याही व्यक्तीस त्याच्या जातीच्या आधारावरून उन्नतीची संधी नाकारण्यात येऊ नये' हा निरोगी समाजव्यवस्थेचा पाया असतो. मागील अनेक वर्ष झालेल्या अन्याय दूर करण्याचे साधन म्हणून आरक्षण आहे. परंतु आपण नेहमीप्रमाणे साध्य विसरून जाऊन साधन हेच साध्य मानुन मार्गक्रमण करत आहोत. कारण आज अनेक जाती आम्ही मागास आहोत हे सिद्ध करण्याची अहोरात्र मेहनत करत आहेत. जातीव्यवस्थेचा अंत होण्याऐवजी प्रत्येक जात अधिकाधिक प्रबळ होत चालली आहे.

आर्थिक शोषण करण्यासाठी व्यक्तीचे गुण, कौशल्ये यांवरून त्याचा व्यवसाय असण्याऐवजी त्याची जात बघून व्यवसाय ठरवला जात होता. म्हणजे एका बाजूला मागास

समाजातील गुणवान व्यक्तीला त्याची जात मागास असल्याने आर्थिक विकासाची संधी उपलब्ध होऊ दिली जात नव्हती तर दुसरीकडे कौशल्ये, गुण नसतानाही केवळ जात बघून तो श्रेष्ठ गणला जात असे. म्हणजेच समाजातील विशिष्ट जातीसमुहाला शिक्षण घेण्याची संधी नाकारण्यात येत होती. अर्थातच हे आर्थिक शोषण करणारे होते. महात्मा फुलेंच्या शब्दात सांगायचे तर

विद्येविना मती गेली | मतीविना नीति गेली | नीतीविना गती गेली |गतीविना वित्त गेले |

वित्ताविना शुद्र खचले | इतके अनर्थ एका अविद्येने केले!

आर्थिक मागासलेले असल्याने महागडे शिक्षण परवडत नाही आणि शिक्षण नसल्याने पुन्हा चांगल्या संधी नाही. असे दुष्टचक्र समाजाच्या आर्थिक असमानतेचे कारण आहे. आर्थिक उन्नती करण्यासाठी आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्याला कौशल्यावर आधारित शिक्षण तसेच व्यावसायिक शिक्षण माफक शुल्कात मिळाले तर त्याची प्रगती निश्चित होऊ शकते. कारण, आजच्या प्रगत युगात कौशल्ये, गुणवत्ता असलेल्या व्यक्तीस केवळ जात-धर्म बघून नक्कीच डावलले जात नाही. म्हणजेच एखादा केवळ उच्चवर्णीय आहे म्हणून त्यास गुणवत्ता नसतानाही संधी मिळते असे होत नाही. थोडक्यात व्यावसायिक स्पर्धेच्या, सर्वोत्कृष्टतेच्या आग्रहाच्या या युगात कोणाचीही निवड जात अथवा धर्मावरून केली जात नाही. म्हणून गुणवत्ता प्राप्त करण्यासाठी परवडणाऱ्या शिक्षणाच्या समान संधी निर्माण होणे गरजेचे आहे. असे झाले तरच गरीब श्रीमंत अशी आर्थिक दरी कमी होऊ शकेल.

आजच्या परिस्थितीत एखाद्या विशिष्ट धर्मातील-जातीतील सर्व व्यक्ती मागास आहेत किंवा दुसऱ्या समाजातील सर्व व्यक्ती विकसित आहेत असे म्हणता येणार नाही. या अर्थाने एखाद्या धर्म अथवा समाज विकसित अथवा मागास असे कसे ठरवता येईल? म्हणजेच एखाद्या व्यक्तीला त्याच्या आर्थिक स्तरावरून मागासलेपण न ठरवता त्याच्या जाती-धर्मावरून मागासलेपण ठरवणे वैचारिक प्रगल्भतेचे लक्षण आहे असे आपण म्हणू शकत नाही. एखाद्या समाजाचे व्यक्तीचे मागासलेले असणे हा निकष ठरवायचा असल्यास त्यांना विकास करण्यासाठी मिळत असलेल्या संधी याचाच विचार करावा लागेल. म्हणजे संधी उपलब्ध असताना तो व्यक्ती स्वत:ची आर्थिक उन्नती करू शकत नसेल तर त्याला मागास कसे ठरवले जाऊ शकते?

प्रत्येक धर्मात-समाजात गरीब आहेत. त्यांना सर्वांसोबत आणायचे असल्यास त्याना आर्थिक विकासाची संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. इथे जाती-धर्माचा प्रश्नच येत नाही. आर्थिक असमानता हे समाज दुभंगण्याचे मूळ कारण आहे. नक्षलवादा सारखे गंभीर प्रश्न केवळ आर्थिक असमानता या मूळ मुद्यावर फोफावत चालले आहेत. दहशतवादी गट गरीब युवकांनाच आपले लक्ष्य बनवतो. म्हणून कौशल्यावर आधारित व्यावसायिक शिक्षणाच्या व्यापक संधी आणि त्यातून आर्थिक उन्नती असे आपले धोरण असल्यास देश तसेच समाजासमोरील अनेक प्रश्न सुटू शकतात. जातीअंताची लढाई आणखी गतिमान होऊ शकते. अर्थात यासाठी विकासाची प्रामाणिक राजकीय इच्छाशक्ती हवी. राजकीय लाभासाठी जाती संस्था बळकट करणारे संधीसाधू नेते हीच खरी देशासमोरची अडचण आहे.

(हा लेख दैनिक दिव्य मराठी मध्ये दि. ११/०३/२०१४ रोजी प्रकाशित झालेला आहे.
)

# स्वामी विवेकानंद : स्फूर्तीदायी स्मरण

प्रत्येक जण धावत असतो. पैसा, मान सन्मान, सत्ता, प्रसिद्धी मिळवल्यानंतरहि कशाची तरी कमतरता जाणवते. कारण जायचे कुठे आहे? आणि ते ध्येय स्वत:स निश्चितपणे जाणून, तपासून घेतले आहे का? अशा प्रश्नांची उत्तरे नकारार्थीच येण्याची शक्यता आहे. हि कमतरता नेमकी काय आहे हे कळण्यासाठी किंवा मानवजन्माची सार्थकता कशात आहे हे समजण्यासाठी स्वामीजींचे स्मरण आवश्यक ठरते. प्रत्येकाने आपल्या आयुष्यात दिव्यता येण्यासाठी कार्यरत असले पाहिजे आणि त्यासाठी आवश्यक असणारी प्रेरणा, स्फूर्ती स्वामी विवेकानंदांच्या चरित्रातून निर्माण होऊ शकते.

विवेकानंदांच्या चरित्रातील सर्वात प्रेरक आहे ते त्यांचे सत्यशोधनासाठी असलेले प्रामाणिक प्रयत्न, त्याच्यासाठी आवश्यक त्याग, तळमळ, समर्पण आणि एकदा ते सापडल्यावर आपल्यासारखा लाभ इतरांनाही व्हावा हि इच्छा. स्वामीजींनी कोणतेही तत्व, प्रमाण स्वीकारताना ते बौद्धिक पातळीवर घासून पडताळून घेतले. विवेकवादाची हि खरी साधना म्हणावयास हवी.

सध्याच्या काळात अनेकजण 'विचारवंत' या उपाधीला प्राप्त करून घेण्यासाठी बिनदिक्कतपणे तत्व, विचार नाकारतात. तत्व खरे कि खोटे याचा प्रामाणिक सत्यशोधनात हि मंडळी जात नाहीत. आणि एखादे वेळेस स्वत:ला पटून देखील केवळ 'प्रतिमा' जपण्यासाठी सत्य न स्वीकारता बौद्धीक अनाचार माजवतात. विवेकानंदांचे स्मरण याकरिता आवश्यक आहे त्यांच्या सारखा एक नास्तिक व्यक्ती पुढे कालीमातेचा परमभक्त बनतो आणि वेदांताचे तत्वज्ञान अवघ्या विश्वाला शिकवू लागतो. नास्तिक नरेंद्र ते संन्यासी विवेकानंद हा प्रवास अत्यंत विलक्षण असाच आहे.

दुसरे असे कि, ज्याप्रमाणे अनेक जण मोक्षप्राप्तीसाठी हिमालयात जाऊन वर्षानुवर्षे एकांत वासात साधना करतात. परंतु स्वामी विवेकानंदांचे वेगळेपण असे कि त्यांनी 'शिवभावे जीवसेवा ' हे ब्रीद आपल्या आयुष्याचे ध्येय निश्चित केले. आपल्याला झालेला मुक्तीलाभ विश्वातील

सर्व प्राणीमात्रांना व्हावा यासाठी त्यांनी अहोरात्र प्रयत्न केले. सामान्य जनाची दैन्यावस्था पाहून त्यांचे अंतकरण व्याकूळ होत असत. म्हणून त्यांनी त्यांच्या दु:ख निवारणासाठी, त्यांना जमेल ते साहाय्य करण्यासाठी स्वत:स झोकून दिले. स्वामीजी केवळ पोथी पंडित नव्हते तर क्रियाशील होते. त्यांचा असा दृढ विश्वास होता कि 'जर लोकांचे बाले करण्याची तुमची खरोखर इच्छा असेल तर सर्व विश्व जरी तुमच्या विरुद्ध उभे राहिले तरी ते तुम्हास अपाय करू शकणार नाही. तूम्ही जर निष्ठावान आणि खरोखर निस्वार्थी असाल तर तुमच्यातील त्या परमेश्वरी शक्तीपुढे त्या विरोधाचा धुव्वा उडेल '

अशा प्रकारे त्यांनी मरगळलेल्या, आत्मविश्वास गमावलेल्या सामान्य जनास जगण्याची स्फूर्ती दिली. भारताच्या गौरवशाली इतिहासाचे स्मरण करून दिले. स्वामीजींच्या प्रेरणेने कित्येकांनी आपले आयुष्य भारतमातेच्या सेवेसाठी अर्पण केले. हि खचितच सोपी गोष्ट नव्हे. त्यांनी स्वत:च्या चरित्रातून इतरांना प्रेरणा दिली. यामुळे हा युवा संन्याशी लोकांचा हा संघ भारतमातेच्या सेवेसाठी अवघा भारत पादाक्रांत करत होता. प्रत्येक जीवात्म्याला सांगत होता कि ' तू अमृताचा पुत्र आहेस. आपले जीवन दिव्य बनवण्याचा तुला पूर्ण अधिकार आहे. ' स्वामीजींनी कुठलेही व्यक्तिस्तोम माजवले नाही कि कर्मकांडाचा बागुलबुवा केला नाही. त्यांनी जाणले होते कि धर्म हा भारताच्या सांस्कृतिक जीवनाचा पाया आहे. परंतु त्याची अवस्था जीर्ण झाली आहे. म्हणून त्यांनी धार्मिक होणे म्हणजे नेमके काय? हे सांगितले ते म्हणतात ' धर्माविषयी नुसत्या लांबलचक बाता मारूनच धर्म आचरण होत नसते;असे जीवन दाखवा बघू कि ज्यात त्याग, आध्यात्मिकता तितिक्षा आणि अनंत प्रेम मूर्त झाले आहे. हे सारे गुण असतील तरच तुम्ही धार्मिक व्यक्ती झालात. 'भारतासारख्या देशात धार्मिकतेची हि व्याख्या प्रत्येकाने स्वत:च्या अंगी बाणली तर निश्चितच एका सृजनशील समाजाची निर्मिती होण्यास वेळ लागणार नाही.

विवेकानंदांना देशातील युवकांकडून खूप अपेक्षा होत्या त्यांन वाटे कि ज्याचे देशावर प्रेम आहे, ज्याचे स्वत:च्या धर्मावर प्रेम आहे त्याने सर्वसाधारण लोकांना दुरापास्त झालेल्या शास्त्रातील ज्ञान प्रदान करावे कारण हेच खरे वारसदार आहेत. स्वामीजींनी आपल्या आयुष्यात भरपूर प्रवास केला. प्रवासात त्यांनी देशातील विविधता अनुभवली. अनेकांना हि विविधता

कार्यातील अडथळा वाटते. परंतु विवेकानंद म्हणत ' विचार पद्धतीतील विभिन्नता राहील तोपर्यंतच आपण अस्तित्वात राहू. मात्र विभिन्नता आहे म्हणजे परस्पर कलह, एकमेकात भांडणे असली पाहिजेत असे मात्र मुळीच नाही. माझा मार्ग माझ्यापक्षी ठीक आहे तुमच्यापक्षी नाही. याला इष्ट असे म्हणतात आणि प्रत्येकाचे इष्ट वेगवेगळे असू शकते. ' विवेकानंदांचे स्मरण यासाठी आवश्यक आहे. भारतासारख्या पावलोपावली विविधता असलेल्या देशात इतका प्रगल्भ विचार रुजू लागला तर आपण खर् या अर्थाने सामाजिक सदभाव निर्माण करू शकू.

आयुष्याच्या परिपूर्णते विषयी स्वामीजी आत्म्याचे सर्वज्ञत्व अथवा पूर्णत्व होण्यात असल्याचे विषद करतात. यासाठी वासनांना जिंकल्या खेरीज हे शक्य नसल्याचे ठामपणे सांगतात. भारताच्या वर्तमान परिस्थितीत स्वामीजींचे विचारधन अत्यंत प्रभावी वाटते. केवळ देशवासीय नव्हे तर विदेशातही आपल्या अद्वितीय प्रतिभेने वेदांताची खरी शिकवण स्वामीजींनी अवघ्या विश्वाला शिकविली.

भारतमातेच्या उत्थानासाठी तरुणांना कार्यप्रवण करणारे विवेकानंद खरेखुरे विवेकवादी आहेत. ईश्वर प्राप्ती म्हणजे केवळ पोथी पंडित पणा नव्हे कर्मकांड हि नव्हे तर प्रत्येक जीवात्म्याचे दु:ख करण्यासाठी त्याला जमेल ते सहाय्य करणे होय. अशी वास्तववादी आध्यात्मिकता विवेकानंदानी प्रत्यक्ष आचरणात आणून एक आदर्श निर्माण केला. प्रसंगी आपल्या कुटुंबियांची आर्थिक ससेहोलपट सहन केली पण भारतमातेच्या सेवेचे व्रत सोडले नाही. याकरिता या महान भारतमातेच्या पुत्राचे स्मरण आहे. भारतमातेचे गतवैभव प्राप्त करण्यासाठी आवश्यक असणारी विचारांची नवसंजीवनी याच्यात आहे. आपणही प्रेरणा घेऊन भारतमातेच्या सेवेत आपले योगदान देऊया. शिवभावे जीवसेवा करूया.

(हा लेख दैनिक लोकसत्ताच्या लोकरंग पुरवणीत दि. १२/०१/२०१४ रोजी प्रसिध्द झालेला आहे. )

# शिक्षक नावाचे विद्यापीठ

समाजामध्ये ज्या व्यक्तींना सर्वात जास्त मान -सन्मान व एका अर्थानेसमाजावर ज्यांचा नैतिक दरारा आहे त्यामध्ये शिक्षकांचा क्रमांक सर्वात वरचा आहे. प्रत्येकाच्या आयुष्यात पालकानंतर शिक्षक अशी एक व्यक्ती असते जीच्याबद्दल आपल्या मनात कायम आदराचे स्थान असते. याचे कारणपौगंडावस्थेत असलेल्या आपल्या बेधुंद मनाला आकार देण्याचे सृजनशील कार्यशिक्षक करतात. शिक्षक म्हणजे हातात फक्त छडी घेऊन मोठ्याने खेकसणाराखडूस व्यक्ती असेच चित्र अनेकांच्या मनात असते. शैक्षणिक क्षेत्रात अधिकाधिक धोरणात्मक बदल होत असताना, गुणवत्ता की सार्वत्रिकीकरण यासारख्या काही गुंतागुंतीच्या संकल्पनाबाबत सुवर्णमध्य दिसत नसताना शिक्षकांचे कार्य निश्चितच आव्हानात्मक आहे. अशा परिस्थितीत शिक्षकांच्या क्षमतेची खरी कसोटी लागते व त्यामुळे जबाबदारीही वाढते. शिक्षक-विद्यार्थी संबंधात काहीवेळेस शिस्तीचा अतिरेक केला जातो, तर काही वेळेस शिस्त नावाची काही गोष्ट आहे याचा ठावठिकाणा ही सापडत नाही. खरेतर शिक्षक हा पालक असतो. त्याने विद्यार्थ्यांच्या भाव विश्वात डोकावले पाहिजे. त्यांच्या अडी-अडचणी समजून घेतल्या पाहिजेत. असे केल्याने विद्यार्थी ज्या गोष्टीची चर्चा आपल्या पालकांसोबत करू शकत नाहीत त्या शिक्षकांसोबत सहजतेने मांडून आपले मन मोकळे करू शकतात. विद्यार्थ्यांच्या मनातील अनेक भय-चिंता यांच्या गाठी शिक्षकांच्या सहज संवादाने दूर होऊ शकतात. विद्यार्थ्याचा कल, त्याची आवड व त्याच्यातील क्षमता ओळखून त्याला आयुष्यात यशस्वी होण्यासाठी शिक्षक योग्य मार्गदर्शन करू शकतात. इतिहासात डोकावून पाहिल्यास असे अनेक कर्मयोगी सापडतील की ज्यांनी शिक्षकी पेशा हा व्रत म्हणून स्वीकारले. वैयक्तिक आयुष्यात निर्लोभी वृत्तीने प्रपंचाचा गाडा चालवला, प्रसंगी अनेक आघातसहन केले परंतु आपल्या मूल्यांशी

कधीही तडजोड केली नाही. या सृजनाच्यासाधकांनी आपल्या विद्यार्थ्यांमध्ये या जीवनमूल्यांचा वस्तुपाठ आपल्याआचरणाने घालून दिला. म्हणून आपण पाहतो की, ज्या व्यक्तींनी स्वत:च्या क्षेत्रात उत्तुंग यश कमावले आहे त्यांच्या आयुष्यात शिक्षकाचा अत्यंत जबरदस्त प्रभाव प्रकर्षाने दिसून येतो. काहीनी तर आपल्या शिक्षकाच्या घरी राहून आपले शिक्षण पूर्ण केले. स्वत:च्या आयुष्यात नैतिक मूल्यांचे आचरण करून समाजासमोर एक आदर्श मांडणारे शिक्षक एका अर्थाने समाजालाच घडवणारे शिल्पकार आहेत. समाज निरोगी राहण्यात, समाजाची संवेदनशीलता टिकवूनठेवण्यात शिक्षकांची भूमिका अत्यंत निर्णायक स्वरूपाची आहे. एका अर्थाने शिक्षकाकडे समाजाच्या बौद्धिक क्षेत्राचे नेतृत्व असते. म्हणजे एखादया व्यक्ती, घटना अथवा परंपरा या विषयी शिक्षकाचे मत हे दिशादर्शक असते.

शिक्षकांप्रती समाजात असलेला अनादर वाढावा अशा अनेक घटना घडत असल्या तरी सुध्दा आजही अनेक ठिकाणी विद्यार्थी घडवण्याचे राष्ट्रकार्य करणारे शिक्षक कार्यरत आहेत. त्यांची संख्या कमी असेलही, पण म्हणून शिक्षकांविषयी नकारात्मक सूर आळवन्यापेक्षा शिक्षकी पेशा मधील क्षमतांचा जागर होणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षक हा अनेक पिढ्यांना घडवत असतो. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, नीतिमूल्ये यांची शिकवण तो रुजवू शकतो. आपल्या सहज संवादाच्या माध्यमातून सामाजिक जाणिवा व श्रम शक्ती विषयी प्रतिष्ठा निर्माण करण्यात शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. खरेतर, विद्यार्थ्यांशी संवादाचा सेतू बांधून त्यांच्या निरागस भाव विश्वाशी जोडले गेल्यास अनेक कोमेजणाऱ्या कळयाना नवसंजीवनी मिळू शकेल.

शिक्षक ही केवळ व्यक्ती नसून संस्कारांचे एक विद्यापीठ असते याचे उदाहरण म्हणजे 'शामची आई' या अजरामर ग्रंथाचे लेखक साने गुरुजी. शिक्षक हा कसा असावा याचा आदर्श वस्तुपाठ म्हणजे साने गुरुजी. मातृ हृदयी असणाऱ्या साने गुरुजींच्या मनात राष्ट्र व सामाजिक संवेदना केवळ बोलन्यापुरता नव्हत्या तर प्रत्यक्ष आचरणाने त्यांनी समाजात जीवन मुल्यांची

पुनर्स्थापना केली. यातून समाज निर्मितीच्या कार्यात शिक्षकांच्या अफ़ाट क्षमतांचे दर्शनहोते. आजही ग्रामीण भागातील अनेक गावात शिक्षकांच्या माध्यमातून विकासाची सामुहिक इच्छाशक्ती निर्माण झालेली दिसून येईल. ज्यामुळे गावाचा, परिसराचा कायापालट होऊन विकासाची गंगा प्रवाहित झाल्याचे दिसून येईल. विशेषकरून व्यसनमुक्ती, वृक्षारोपण यासारखे सामुहिक विकासाला दिशा देणाऱ्या मुद्यांची अंमलबजावणी शिक्षकांच्या पुढाकाराने प्रत्यक्ष स्वरूपात झाल्याचे दिसून येईल. विद्यार्थी घडवून एक संवेदनशील नागरिक घडवणे व अशा नागरिकांच्या माध्यमातून राष्ट्रनिर्मिती व एका अर्थाने मनुष्य निर्माणाचे कार्य करून शिक्षक हा खऱ्या अर्थाने सृजनाचा साधक होऊ शकतो.

विकासाची अंत:प्रेरणा व आपल्या कार्या विषयी समर्पण वृती शिक्षकाला एका वेगळया उंचीवर नेऊन ठेवते. या उंचीवर असल्याने एक जबाबदारी येते. शिक्षकामध्ये असलेल्या या नितीमुल्यांच्या भक्कम आधारावर समाजातीलसंवेदना उभी आहे. सामाजिक जाणिवा टिकून आहेत. समाजातील वैचारिकप्रगल्भपणा विकास पावत आहे. एकूणच समाजाची जडणघडण होत आहे. असे हे शिक्षकपण स्वीकारलेल्या या व्रतस्थानी स्वत:मधील कर्मयोगी जागवावा, समाजाचे बौद्धिक नेतृत्व स्वीकारावे व खरऱ्या अर्थाने संस्कारांचे विद्यापीठ व्हावे याकरिता हा जागर. शिक्षक दिनाच्या निमित्ताने अशाच काही कर्मयोग्यांचे कार्य स्मरण होणे गरजेचे आहे. ज्यामुळे प्रेरणा निर्माण होऊन सृजनाची ही प्रक्रिया अधिकाधिक गतिमान होऊ शकेल

(दर्पण, साप्ताहिक स्तंभ, दै. पुण्यनगरी )

# प्रेम नावाची समृध्द अडगळ

'या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे' या ओळीतून प्रेम या व्यापक संकल्पनेची, पवित्र भावनेची व एका हळुवार नात्याची खोली स्पष्ट होते. प्रेम म्हणजे निरपेक्ष देणे. हे नाते बांधिलकी, विश्वासावर वर टिकते. प्रेमाचे नाते निर्माण झाल्यावर तेथे हव्यास नसतो तर समर्पण असते. जगण्याचे क्षण हे यज्ञातील समिधेसमान असते. प्रेमाचे नाते म्हणजे जगण्यातील खरे मर्म समजते. एखाद्या व्यक्तीविषयी, तत्वाविषयी अथवा देशाविषयी प्रेम निर्माण झाल्यावर एक भावानिक बंध निर्माण होतात, बंधने नाही. प्रेम म्हणजे आपल्या प्रेमास्पदाविषयीचा नितांत आदर सहजपणे निर्माण होतो.

परंतु दुर्दैवाने प्रेमाच्या व्याख्या काळानुरूप बदलल्या गेल्या आहेत. सध्याचे प्रेम म्हणजे केवळ शरीर सुखापुरतेच संकुचित झाले आहे. त्यातून मग एकतर्फी प्रेम व त्यामुळे तरुणींवर होणारे अत्याचार या बाबी अत्यंत दुर्दैवी आहेत. जन्मोंजन्मी साथ देण्याची शपथा घेणारे प्रेमवीर सध्या ब्रेक अप, लिव्ह इन यांसारख्या शब्दात अधिक रमले आहेत. मृगजळासमान क्षणिक आकर्षणाकडे बेधुंद होऊन धावत जातात सिमकार्डसारखे बॉयफ्रेंड-गर्लफ्रेंड बदलले जातात. यात खरे प्रेम कमी व देखावा जास्त असल्याने असले प्रेमनाट्य जास्त काळ टिकत नाही. हिंदी- मराठी चित्रपटातील नायक व नायिका यांच्या प्रेमकथांनी प्रेरित होऊन त्यांचे अनुकरण करण्याकडे जास्त कल असतो. म्हणजे आपल्या डोक्यावरील केशरचनेपासून ते कपडे व बोलण्यापर्यंत सर्व काही कोणाला तरी इम्प्रेस करण्यासाठीच असते. स्वत:च्या व्यक्तिमत्वाला साजेसे व स्वत:स अनुरूप असणारे वागणे-बोलणे फारच कमी प्रमाणात आढळून येते. अशा जगण्याने आयुष्यात कृत्रिमता येते. स्वत:शीच सारखी फसवणूक केल्याने एक अस्वस्थता कायम असते. आपल्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येकाने आपली सतत स्तुती करावी अशी भावना प्रबळ होणे हे कृतीम जगण्याचे लक्षण आहे. अशा त-हेने 'इम्प्रेस' करून तयार झालेले नाते हे प्रेम नक्कीच नव्हे. असला देखावा कधी ना कधी कोसळणारच. परंतु बेभान स्वातंत्र्याच्या धुंदीने मनाचा ताबा घेतला की विवेकाचे अस्तित्व नाहीसे

होते. या विकृतीचा दुष्परिणाम समाजावर होतो. ‘पब्लिक डिसप्ले ऑफ अफेक्शन’ ही अशाच विकृत वृक्षाची फळे देशाच्या अनेक भागात पसरत आहेत. असल्या विकृतीत प्रेमीयुगुले जाहीरपणे शारीरिक लगट करतात. शरीरसुख म्हणजे प्रेम नव्हे व दुसरे तेही असे उघडपणे करणे म्हणजे स्वातंत्र्याचे अपचन झाल्याचे लक्षण आहे. 'आम्ही वाट्टेल ते, आम्हाला आवडेल त्या पध्दतीने करू शकतो आम्हाला कोणीच अडवू शकत नाही कारण आम्ही स्वतंत्र आहोत '. असला माज स्वातंत्र्याचे अपचन झालेल्या व्यक्तींच्याच ओठी असू शकतो. असल्या लाज सोडलेल्या उपटसुंभाना वेळीच समज दिली पाहिजे. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. समाजात कुटुंबात वावरत असताना काही बाबी या अगदीच खासगी असतात. पती-पत्नी सुध्दा कुटुंबात वावरत असताना सर्वांसमक्ष शारीरिक लगट करत नाहीत. व्यक्तीस्वातंत्र्याच्या नावाने कोणी रस्त्याने नागडा फिरत नाही. ही किमान समज ज्यांच्या बुद्धीच्या परिघाबाहेर जात असेल तर त्यांचे प्रबोधन कायद्यानेच केले पाहिजे. कोणतेही कार्य करत असताना स्थळ-काळ-वेळ यांचा विचार करावा असा संकेत आहे. त्या अनुकूल असतील तर कार्य चांगल्या पध्दतीने होऊ शकते असा सारासारविवेक आहे. परंतु विवेकाची बोळवण केलेल्यांकडून अशी अपेक्षा करणेच निरर्थक आहे. स्वातंत्र्याला विवेकाची साथ असणे समाजहिताच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे.

याचे कारण असे की, ‘पब्लिक डिस्प्ले ऑफ अफेक्शन’ ही मानसिकता स्वातंत्र्य व अविवेकाची पैदास आहे. ही विकृती वाढत गेली तर उद्या महाविद्यालये ही केवळ शारीरिक सुख मिळवण्याचे हक्काचे ठिकाण होऊन जातील. परिणामी तरुणाई व्यसने, अश्लीलता यांच्या आहारी जाऊन विवेकहीन बनण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्वातंत्र्य व त्यासोबत असलेली जबाबदारी लक्षात घेऊन बेभान न होता विवेकयुक्त सामाजिक आचरण झाले पाहिजे.

प्रेम ही समृद्ध अडगळ होऊ नये ही शरीरसुखाच्या पलीकडे असणारी नितांतसुंदर अशी भावना आहे. या भावनेला जपावे, त्याचा देखावा करू नये. त्याग व समर्पण या आभूषणानी त्या पवित्र भावनेला सजवावे. तरच ही समृद्ध अडगळ न होता जगण्याची शक्ती बनेल.

(दर्पण, साप्ताहिक स्तंभ, दै. पुण्यनगरी )

# नतदृष्टांचे रडगाणे

‘घर की मुर्गी दाल बराबर’ अशी एक म्हण प्रचलित आहे. एखादे ऐतिहासिक महत्व असलेले साहित्य, स्थान आपल्या जवळ असेल तर तर त्याचे महत्व आपल्या दृष्टीने अडगळीचेच असते. विशेषकरून व्यक्तींच्या बाबतीत तर तो व्यक्ती आपल्यातून निघून गेल्याशिवाय त्याचे मुल्य कळतच नाही. त्यानंतर त्या व्यक्तीचे पुतळे उभे करण्यात मात्र आपल्याला प्रचंड उत्साह असतो. अनेकवेळा तर महत्व कळूनही जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष केले जाते. जेव्हा त्या व्यक्ती, साहित्य, स्थाने यांचे श्रेष्ठत्व विदेशात मान्य केले जाते तेव्हा आपण त्याच्या श्रेष्ठत्वाला मान्यता देतो किंबहुना त्यांच्या श्रेष्ठत्वाबद्दल आतापर्यंत असलेली आपली हरकत मागे घेतो. अशा ही नतदृष्टपणाची कीड भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात सुध्दा प्रभावी होती. तत्कालीन पुढारी इंग्रजाची मर्जी सांभाळण्यासाठी स्वदेश, स्वसंस्कृती, स्वदेशाभिमान, येथील सामान्य जनता यांची जमेल त्या वेळेस मानहानी करायचे. असल्या नतदृष्टांनी तात्कालिक फायद्यासाठी स्वत:च्या बुद्धीला गहाण ठेवून राष्ट्रभावनेचे अतोनात नुकसान केले. दुर्दैवाने अशांची वंशावळ आजही आपल्या पूर्वजांचा वारसा चालवत आहे. रवीन्द्रनाथानी असल्या घाणेरड्या वृत्तीवर ‘हाते कलमे’ नावाचा निबंध लिहून कडाडून टीका केली होती. अनेकजण विचारवंत उपाधी मिळवण्यासाठी अक्षरशः घायकुतीला आलेले असतात. यासाठी त्यांना तातडीने पुरस्कार, मानसन्मान मिळवायचा असतो. म्हणून स्वदेशाभिमान खुंटीला टांगून स्वदेश, स्वभाषा, स्वसंस्कृती यांच्यावर टीका करायची व आपले उपद्रवमूल्य वाढवून घ्यायचे या मार्गाचा अवलंब ते करतात. यामुळे त्यांची विद्वत्ता (? ) सिद्ध होईल या भाबड्या आशावादाने त्यांना घेरलेले असते. प्रसिद्धी स्रोताचे अधाशी असणारे महाभाग अशाना गाठतात व त्यामुळे दोघांचेही हेतू साध्य होतात. परंतु असल्या अनिष्ट चालीरीतींनी राष्ट्रभावनेचे

अतोनात नुकसान होते. ही मंडळी आपल्या सोयीनुसार पुरोगामित्व, धर्मनिरपेक्षता यांच्या व्याख्या बनवतात व आपल्या मनसुब्यांना विरोध करणा-यांना मागासलेले अथवा धर्मांध ठरवतात.

भारताच्या आध्यात्मिक परंपरेत अनेक ग्रंथांनी वैश्विक बुद्धिवंतांच्या पातळीवर मान्यता, मानसन्मान मिळवला आहे. यात 'श्रीमदभगवदगीता' या अलौकिक ग्रंथांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. महात्मा गांधी, विनोबा भावे, लोकमान्य टिळक या व अशा अनेक जगन्मान्य विभूतींच्या जीवनाची तात्विक बैठक गीतेवर आधारलेली आहे. संत ज्ञानदेवानी गीतेतील ज्ञानाचा अनुपम रस सामान्य जणांना मिळावा याकरिता संस्कृत श्लोकाचे भाषांतर प्राकृत भाषेत केले. ही ज्ञानेश्वरी आजही करोडो वारक-यांच्या मनावर अधिराज्य गाजवते आहे. अशा या भूषण असलेल्या ग्रंथाला केवळ हिंदू धर्माचा असल्याकारणाने दुय्यम स्थान देण्याचा प्रयत्न होत आहे. वास्तविक या ग्रंथात जीवनविद्येचे शिक्षण आहे. हा लढा सत्तेसाठी नसून सत्कर्म व कुकर्म यांच्यामधील आहे. नीती व अनीती यांच्या युद्धात प्रसंगी आपल्या नातेवाईकांशी लढावे लागले तरी त्यास न डगमगता समर्थपणे सामोरे जाण्याची शिकवण गीतेत आहे. गीतेचा संदेश हा गलितगात्र झालेल्या समाजपुरुषास कर्मयोगी होण्यास प्रेरणा देतो. दैनदिन जीवनात आपण नैतिक मुल्ये आचरणात आणावी यासाठीचा हा संदेश आहे. गीता समजुन घेणारा आणि त्याप्रमाणे आचरण करणारा कुठलाही व्यक्ती सृजनशील बनतो. समाजात मनुष्यनिर्माण घडवणारी नितांतसुंदर अशी ही उर्जा शक्ती आहे. अर्थात यावर जरूर चिकित्सा करावी, विविध पैलू पडताळून बघावेत, परंतु प्रश्न आहे तो प्रामाणिक सत्यशोधनाचे प्रयत्न करण्याचा. बहुतेकजण पूर्वग्रहदुषित होऊन मांडणी करतात त्यामुळे त्यांच्या हाती फार काही लागत नाही. प्रश्न आहे तो या ग्रंथाला हिंदू धर्मीय आहे म्हणून दुय्यम ठरवण्याच्या नतदृष्ट्पणाचा.

योगविद्येच्या बाबतीतही असाच सूर उमटत होता. शाळेत योगासने, प्राणायाम शिकवणे म्हणजे शिक्षणाचे भगवेकरण करणे असा प्रचार संधिसाधू धर्मनिरपेक्षतावाद्याकडून केला

गेला. वास्तविक गीता हा ग्रंथ मन निरोगी करत असेल तर योगविद्या मनगट मजबूत करते. या देशातील महान आचार्य परंपरा योगशास्त्राची जनक आहे. या अर्थाने खरेतर देशातील प्रत्येकाने योगविद्येचा अभिमान बाळगून त्याचा अभ्यास केला पाहिजे. देशविदेशातील करोडो लोक योगशास्त्र शिकण्यासाठी भारतात येत असतात. आपली आध्यात्मिक शास्त्रे, तत्वज्ञान, योगविद्या येथील महापुरुष हे आपले ज्ञानाचे, सांस्कृतिकतेचे ऐश्वर्य आहेत. या देशात जन्म घेणारा प्रत्येकजण याचा वारसदार आहे. परंतु या अभिमानास्पद असलेल्या बाबींवर एखादा शिक्का मारून त्याची मानहानी करणे नतदृष्ट्पानाचे आचरण आहे. यांच्या रडगाण्याने त्याना काडीचेही समाधान मिळणार नाही. त्याना सुचवावेसे वाटते, जर आपण स्वदेश, स्वभाषा, स्व-संस्कृती यांचा सन्मान केला तरच इतर लोक आपल्याला सन्मानाची वागणूक देतील. स्वत:च्याच कुटुंबातील सदस्यांचा अपमान करणारा, सांगणारा जगात कुठेही सन्मान मिळवू शकत नाही. गीता राष्ट्रीय ग्रंथ होईल अथवा होणारही नाही परंतू आपल्या तात्कालिक स्वार्थापोटी राष्ट्राभिमानाला हानी पोहोचेल असे वर्तन करू नये. याचा अर्थ असा नक्कीच नव्हे की, स्वत:ची बुद्धी न चालवता 'बाबा वाक्यं प्रमाणम' या प्रमाणे आंधळेपणाने सर्व काही मान्य करावे. याउलट प्रत्येक बाबी बुद्धीच्या पातळीवर तपासून बघाव्यात. मात्र यासाठी आवश्यकता आहे ती प्रामाणिक प्रयत्न करण्याची. याचे परिपूर्ण उदाहरण म्हणजे जगभरात आपल्या मातृभूमीला, स्व-संस्कृती ला सन्मान प्राप्त करून देणाऱ्या स्वामी विवेकानंदाचे. ज्यांनी सखोल अभ्यास, चिंतनाच्या बळावर येथील आध्यत्मिक शास्त्रात प्राविण्य मिळवले व मनुष्यत्वाचा संपूर्ण विकास कशात आहे हे स्पष्ट केले. सर्व सामान्यांना या मार्गावर चालण्यासाठी दिशा दाखवली. शेवटी इतकेच म्हणावेसे वाटते की, नतदृष्ट्पणाचे रडगाणे बंद करावे व स्वदेशाभिमान जागृत ठेवून राष्ट्रभावना मजबूत करावी.

(दर्पण, साप्ताहिक स्तंभ, दै. पुण्यनगरी )

# सावर रे मना. . . . .

जगण्याचा आनंद घेण्यासाठी ज्याप्रमाणे निरोगी शरीर आवश्यक आहे त्याचप्रमाणे मन ही निरोगी असणे अत्यंत आवश्यक आहे. मनाचे अंतरंग जाणणे अथवा त्याचा थांग लागणे हे निश्चितच सोपे काम नाही. परंतु एक मात्र नक्की की, व्यक्तीच्या दैनदिन आचरणात मनाच्या व्यवहाराचे निरीक्षण केले तर असे जाणवेल की आपल्याला अस्वस्थ करणाऱ्या अनेक मानसिक त्रासाचे कारण आपल्या मनाच्या गाभाऱ्यात दडलेले आहे, परंतु ते निरोगी राहावे यासाठी आपण फारच थोडे प्रयत्न करतो. मनाचा व्यवहार सुरळीत चालावा यासाठी संत साहित्यात सविस्तर संशोधन-चर्चा करण्यात आली आहे. विशेषकरून आध्यात्मिक प्रगती साठी मनाच्या अनियंत्रित व्यवहारावर अंकुश निर्माण करण्याकरीता प्रयत्न केले जातात. चंचलता, अस्थिरता हा मनाचा नैसर्गिक स्वभावच आहे, परंतु प्रयत्नांनी त्याची चंचलता नियंत्रित होऊ शकते. भूतकाळातील त्रासदायक अनुभवांचा शोक अनावर झाला की मन तिथेच गुंतून जाते, परंतु यामुळे वर्तमानात भान हरपलेला व्यक्ती एकाग्रतेने आपले काम करू शकत नाही परिणामी जगण्याचा कंटाळा येतो, किंवा भविष्यकाळातील चिंतेने मनाचा ताबा घेतला की सदैव भीती वाटत राहते. या व अशा अनेक मानसिक समस्या आपले जगणे कुरतडून टाकत आहेत. डिप्रेशन, उच्च रक्तदाब यासारख्या विविध प्रकारच्या आजारांनी अनेकांच्या आयुष्यातून आनंदाला हद्दपार केले आहे. याकरिता मनाच्या आरोग्य संवर्धनासाठी आपल्या दिनचर्येतील काही निश्चित वेळ गांभीर्यपूर्वक राखून ठेवला पाहिजे. संत तुकाराम महाराज आपल्या अभंगात म्हणतात 'मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण ', समर्थ रामदासांनी मनाचे श्लोक रचून मनालाच बोध केला आहे. प्रत्येक यश अथवा अपयश हे प्रथम मनामध्येच तयार होत असते. मनाच्या उत्तम आरोग्यासाठी आपला स्वत:शीच सुसंवाद असला

पाहिजे. आपली दृष्टी ही अंतर्मुख असली पाहिजे. स्वत:चे कठोर, निरपेक्ष परीक्षण करता आले पाहिजे. म्हणजेच आपण सर्वात अगोदर स्वत:ला पूर्णपणे ओळखले पाहिजे. एकदा स्वत:शीच ओळख झाली म्हणजे पुढचा मार्ग सोपा बनत जातो.

आपले जगणे म्हणजे डोळयावर पट्टी बांधून पळणा-यांची शर्यतीतला एक स्पर्धक असे असता कामा नये. आपल्याला आयुष्यात काय मिळवायचे आहे. यशाची आपली व्याख्या कोणती आहे, ते मिळवण्याचा मार्ग कोणता याची पूर्ण जान ठेवून मार्गक्रमण केल्यास आयुष्य भरकटणार नाही. आपल्या वाट्याला येणारे दु:ख, अपेक्षाभंग यांचे व मान-सन्मान, पद प्रतिष्ठा यांचे पचन करता येणे अत्यंत आवश्यक आहे. याचे कारण असे की, कारण अत्यंत अनुकूल परिस्थिती असताना सामान्यांप्रती असणारा आपला व्यवहार, विशेषकरून भाषा बदलते. तसेच अत्यंत प्रतिकूल परीस्थिती असताना आपण खचून जातो, विमनस्कता निर्माण होते. या दोन्ही प्रसंगी आपण स्थिर राहून परिस्थितीचा सामना करण्यात जगण्याचे सूत्र दडलेले आहे याची जाणीव झाली की, सुखाने पराकोटीचा हर्ष अथवा दुःखाने मनस्ताप होत नाही.

दैवदुर्विलास म्हणजे संवादाची अत्याधुनिक माध्यमे उपलब्ध असताना व्यक्ती उत्तरोत्तर एकलकोंडया होत चालल्या आहेत. संवादाचा अभाव हा अनेक मानसिक समस्यांची जननी आहे.

दुःखाचा अतिरेक झाला की आत्महत्येचा मार्ग निवडला जातो. आत्महत्या करणा-यांच्या आयुष्यात तो निर्णय घेण्यापूर्वी किमान एकदा कोणाशी तरी संवाद झाला असता तर त्यापैकी अनेकांनी आत्महत्या केल्या नसत्या आपल्या आजूबाजूला असे अनेकजण दिसतील की, त्याना बोलते करण्याची खूप आवश्यकता आहे. अनेकवेळेस आपल्या कामाप्रती श्रध्दा व यशाविषयी सबुरी यांची कमतरता जाणवते आहे. सर्वाना झटपट मोठया पदावर जायचे आहे. मात्र अनेकवेळा

त्याकरिता आवश्यक असणारी समर्पित भावना, कष्ट घेण्याची तयारी दिसत नाही. खरेतर अशा वेळेस अपेक्षित यश न येणे अथवा शोर्टकट चा मार्ग वापरून मिळालेल्या तापुरत्या यशाने समाधान न मिळणे हे अगदीच नैसर्गिक आहे. परिणामी एकतर आयुष्याची फरपट होते अथवा स्वत:चीच फसवणूक केल्याने मनाच्या अंतरंगात एक अस्वस्थता सदैव घर करून राहते. हे टाळण्यासाठी वर उल्लेख केल्याप्रमाणे स्वत:ला ओळखणे अत्यंत आवश्यक आहे.

स्वतःशी सुसंवाद असावा, आपल्या संपर्कात असणाऱ्या एखाद्याशी संवाद साधून त्याचे दु:ख हलके केल्यास त्याच्या मनावरचे ओझे दूर होतेच शिवाय आपल्यालाही जगण्याचे अनके पैलू समजून घेता येतात. आपले काही शब्द त्याच्या जगण्याचे आधार बनू शकतात. यापेक्षा मोठी समाजसेवा कोणती असू शकते. जगण्याची लढाई समजून घेण्यासाठी किमान एकदा अनाथांची माय असलेल्या सिंधुताई सपकाळ यांचे चरित्र वाचावे, त्यावर आधारित चित्रपट पाहावा. मी हे खात्रीने सांगु शकतो की असा संघर्ष जाणून घेतल्यावर कोणीही आत्महत्या करण्याचा मूर्खपणा करणार नाही. गडचिरोली, चंद्रपूर, मेळघाट अशा दुर्गम भागात आपले जीवन व्यतीत करणाऱ्या वनवासींचे जीवन बघावे. यातून आपल्याला जगण्याची नवी उमेद, प्रेरणा मिळेल. अशा लोकांसाठी आधार बनलेल्या बाबा आमटे, डॉ. अभय बंग यांच्या कार्याचा अभ्यास करावा. जीवनाला अर्थपूर्ण वळण मिळेल. 'सावर रे मना' हा मंत्र आपण सर्वानी समजून घेतल्यास अनेक खुडणाऱ्या, कोमेजणाऱ्या कळया फुलू लागतील.

(दर्पण, साप्ताहिक स्तंभ, दै. पुण्यनगरी )

# अधर्माचा धार्मिक देखावा

अनादिकाळापासून मानवसमुह धर्मभावनेशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने जोडला गेलेला आहे. समाजमनावर धर्मसत्तेचा मोठा प्रभाव होता किबहुना आजही आहे. नैतिक -अनैतिक संकल्पना, सृष्टीची उत्पत्ती, कार्यकारण भाव, कर्म त्याचा परिणाम या सर्वांची चर्चा, ज्ञान तत्वांच्या द्वारे धर्माच्या माध्यमातून समाजमनावर मांडली जाते. व्यक्तीची जाणीव विस्तारली जावी, त्याला आपल्या अस्तित्वाचे कारण उमजावे व जीवनध्येय साध्य करण्याचा मार्ग सापडला जावा ज्यामुळे त्याचे आचरण आदर्श होऊ शकेल याकरिता धर्माचे निमित्त आहे. साधारणपणे असे म्हणता येईल की, धर्म म्हणजे आदर्श आचारसंहिता अथवा अशी तत्वे ज्यामध्ये सर्व जीवांचे कल्याण सामावले आहे. परंतु भारतीय समाजमनावर प्रबळ असलेल्या धार्मिक भावनेचा अनेक जण दुरुपयोग करताना दिसत आहेत. दांभिकाना स्तुतीपाठकांचे कोंडाळे जमवून व्यक्तिस्तोम माजवणे आवडते. गुन्हेगारांनी जेवढे समाजाचे नुकसान नसेल केले त्यापेक्षा कैकपटीने जास्त नुकसान असल्या महाभागांनी केले आहे. नियती यथावकाश त्यांना त्यांच्या कर्माचे फळ देईलच.

करता था तब करी रहा, अब क्यो पछिताए

बोवे पेड बबुल के आम कहां ते खाए

संत कबीरांनी असे आपल्या दोह्यात सांगितलेच आहे,

परंतु खरा प्रश्न आहे तो स्तुतीपाठकांचा. खरेतर धर्मतत्व नेमके कोणते आहे? खरा साधू कोणास म्हणावे याविषयी अत्यंत स्पष्ट विवेचन संत साहित्यात आहे. अत्यंत थोडक्यात सांगायचे तर 'ऐसी कळवळ्याची जाती, करी लाभाविण प्रीती' असा ज्यांच्या स्वभाव आहे. ज्याना व्यक्तिस्तोम मान्य नाही. अशा विभूती आपल्या संतत्वाचे प्रदर्शन करत नाहीत. आयुष्याची सार्थकता त्यांच्या सहवासाने कळून येते. स्वामी विवेकानंद व त्यांचे गुरु रामकृष्ण परमहंस यांचा संवाद, त्यांचे चरित्र यांचा अभ्यास प्रत्येक जिज्ञासूने केला पाहिजे.

धर्मतत्वांचे वास्तविक आकलन झालेल्या महापुरुषांनी धर्म तत्वांचा सोपा अर्थ जनसामान्याना स्पष्ट करून सांगितला. यासाठी त्यांनी भौतिक सुखोपभोगाचा त्याग करून धर्मतत्वे आपल्या प्रत्यक्ष आचरणात आणली. त्यांच्या हृदयात सामान्याविषयी अपार करूणा असल्याने त्यांनी भोळ्या भाबड्या भाविकांना परमार्थाचे सूत्र उलगडून दाखवले. संत तुकारामांच्या भाषेत सांगायचे तर 'बुडते हे जन न देखवे डोळा ' या भावनेने त्यांनी अनेकांचे आयुष्य आध्यात्मिकतेने भारावून टाकले. संत हे केवळ लोककल्याणाकरता जगत असतात. पद, प्रतिष्ठा, मान-सन्मान, पैसा, स्तुती, बडेजाव यांच्यामध्ये त्याना काडीमात्र रस नसतो. प्रत्येक व्यक्तीला आपल्या आयुष्यात दिव्यता प्राप्त व्हावी हीच त्यांची तळमळ असते. अनेक वेळा समाजाचाच्या कल्याणाचा विचार करण्याऱ्याला समाजाकडून उपेक्षा, त्रास सहन करावा लागतो. परंतु आपल्या ध्येयमार्गावरून ते जराही विचलित होत नाहीत. संत ज्ञानेश्वर व त्यांच्या भावंडाना समाजाकडून, तत्कालीन धर्म मार्तंडाकडून अतोनात छळ, मानसिक क्लेष सहन करावा लागला. परंतु शेकडो वर्षांपासून मराठी माणसाच्या मनोराज्यावर अधिराज्य करणाऱ्या आपल्या ज्ञानेश्वरी या दिव्य ग्रंथात त्यांनी एकाही ठिकाणी याचा साधा उल्लेखही केला नाही, उलट जगनियंत्याला 'जो जे वांछील तो ते लाहो' अशीच

प्रार्थना केली. समाजात आजही अनेक ठिकाणी अशा संत प्रवृतीचे व्यक्तिमत्वे आपल्या कर्मयोगाचे प्रामाणिकपणे पालन करतच आहेत. प्रसिद्धी, पुरस्कार आदी बाबींपासून ते कोसो दूर आहेत.

संतत्व हे येऱ्या गबाळयाचे काम नाही किंवा एखादी पदवीही नाही. संतत्व ही वृत्ती आहे. ही वृती आपल्या व्यक्तीमत्वात रुजण्यासाठी झिजावे लागते. स्तुतीपाठकांच्या गराड्यात रममाण असणारे स्वत:चीच फसवणूक करत असतात. अनेकांच्या आयुष्याशी खेळत असतात. समाजातील व्यक्ती अशा व्यक्तीस्तोमाला आहारी जातात याचे कारण त्यांच्या मानसिकतेत आहे. अनेकांना कमी कष्टात जास्तीत जास्त सुखसोयी-लाभ मिळण्याची अपेक्षा असते. म्हणजे अभ्यास न करता पास व्हावे अशी अपेक्षा करणारा विद्यार्थी, कष्ट न करता गुप्तधन मिळून श्रीमंत होऊ इच्छिणारा आळशी व्यक्ती व विशेष करून आपल्या कर्तव्याला चुकवून यशस्वी होण्याची अपेक्षा करणारा प्रत्येकजण असल्या महाभागांचे सावज. वास्तविक हे अगदीच सहजपणे समजण्यासारखे आहे की कष्ट न करता, प्रयत्न न करता फलाची अपेक्षा ठेवणे शुद्ध भाबडेपणाचे तर आहेच शिवाय स्वत:ची फसवणूक करण्यासारखे आहे. अध्यात्माच्या अभ्यासाने, आचरणाने व्यक्ती कार्यप्रवण होतो, प्रयत्नशील होतो. श्रीमदभगवदगीता याचा सर्वोत्तम पुरावा आहे. नात्यापेक्षा कर्तव्य श्रेष्ठ समजून न्यायासाठी प्रसंगी आप्तस्वकीयांशी युद्ध करावे लागले तरी त्यास आनंदाने सामोरे जाण्याची शिकवण श्रीमदभगवदगीतेमध्ये आहे. ही शिकवण लक्षात घेऊन आपण कर्तव्यप्रवण बनावे, आध्यात्मिक बनावे. आळश्याला कुठलीही देवता कधीच प्रसन्न होणार नाही हे अगदी खात्रीने समजावे. एखादा मार्ग स्वीकारताना अथवा व्यक्तीच्या विचारांचा अनुनय करताना पारखून घ्यावे. संतत्व ओळखण्याची पात्रता स्वत:मध्ये निर्माण करावी. तरच स्वत:चे व समाजाचे हीत आहे. अन्यथा यापुढेही अधार्मिक तत्वे धर्माचा पोशाख घालून आपला देखावा सादर करतच राहतील.

# धर्माचार्यांचा(? ) अधर्म

संपूर्ण विश्वातील आध्यात्मिक क्षेत्रात भारताचे स्थान हे नेहमीच महत्वाचे राहिलेले आहे. उदात्त आध्यात्मीक मुल्यांचा अंतर्भाव असणाऱ्या भारतीय संस्कृती विषयी जगभरात कुतुहल आहे. ईश्वर, ज्ञान, भक्ती, मोक्ष, अनुभूती यांच्या बाबतीत आपल्या देशात चर्चा, मंथन चालूच असते. प्रत्येक व्यक्तीला स्वत:चे जगणे समृध्द करता यावे याकरिता आचरणाविषयी काही मुल्ये विविध मार्गांनी सांगितली गेली ज्यात ग्रंथांचा प्रामुख्याने समावेश होतो. व्यक्तीमधील जगण्याचा दृष्टीकोण व्यापक व्हावा, उदात्त विचार जगण्याच्या केंद्रस्थानी असावेत जेणेकरून त्याच्यातील मनुष्यत्वाचा, सद्गुणांचा संपूर्ण विकास होऊ शकेल व त्याचे जगणे सुखकारक होईल यासाठी एक आदर्श नियमावली आपण स्वीकारली ज्याला धर्म हे नाव दिले गेले. आत्मोन्नती साधण्यासाठी उदात्त नीतीमूल्यांचा समावेश असणारी जीवनपध्दती असे आपण धर्म या संकल्पनेकडे पाहतो. ही जीवनपद्धती प्रत्येकाने आचरणात आणावी, त्याने सदवर्तनाकडे प्रेरित व्हावे यासाठी प्रेरणा आवश्यक असते. ती प्रेरणा निर्माण होण्यासाठी आपल्यासमोर मूर्त स्वरूपात कोणीतरी हवे असते. याकरिता ग्रंथामधुन अवतारकथा व विविध आदर्श सांगितले गेले. ज्यातून व्यक्ती-व्यक्ती मधील नातेसंबंधात मार्गदर्शन मिळत गेले व तसेच

व्यवहारात येणाऱ्या अनेक अडी-अडचणी, समस्या यांचे समाधान या व्यवस्थेकडून होऊ लागल्याने ही व्यवस्था रुजली. थोडक्यात असे म्हणता येईल की, व्यक्तीला या व्यवस्थेकडून जीवन जगण्याच्या कलेचे शिक्षण मिळाले. परंतु कालपरत्वे या व्यवस्थेमधील काही अपात्र व धर्मातील तत्वांचे आकलन न झालेल्या व्यक्तींकडून काही अनावश्यक भाग धर्माचा भाग असल्याचा भास निर्माण केला गेला. ज्याचा विपरीत परिणाम समाजमनावर झाला व या व्यवस्थेला विविध समस्येने ग्रस्त केले. साधन हे साध्य बनले व पुढे चालून तर त्याचे इतके अवडंबर माजले की काही व्यक्तीसमुहाना जगणेच असह्य होऊ लागले.

ज्याना आपण खरे धर्माचार्य म्हणू त्यांचे भूमिका इथे सुरु होते. त्यानी धर्मातील हा अनावश्यक भाग तत्काळ दूर करून सत्य धर्म तत्वांची पुनर्स्थापना करणे गरजेचे होते. धर्माचार्य म्हणवून घेणा-यांचे हे आद्य कर्तव्य आहे. कारण ज्यांनी स्वत: अशा उदात्त धर्मतत्वे आपल्या आचरणात आणून आत्मोन्नती साधली आहे व जे केवळ लोककल्याणासाठी आपले जीवन व्यतीत करतात. ज्यांनी लोककल्याण हे जीवनव्रत म्हणून स्वीकारले आहे व याकरता त्यांनी स्वत: व्यावहारिक जगातील सर्व आकर्षणांचा त्याग केला आहे अशा व्यक्तीना आपण धर्माचार्य म्हणतो. 'शिवभावे जीवसेवा' हे ध्यानी धरून प्रत्येक व्यक्तीला आध्यात्मिक मार्गदर्शन करणे धर्माचार्यांकडून अपेक्षित असते. समाजातील सत्प्रवृत्ती वाढावी, समाज निरोगी असावा याकरिता त्यानी प्रयत्न करायला हवेत. दारिद्रीनारायनाची सेवा करावी, त्याला दु:ख मुक्त करावे.

सध्या ज्या पद्धतीने व्यक्ती स्वत:ला धर्माचार्य म्हणवून घेत आहेत, त्यांच्यात या बाबींचा सुतराम संबंध नाही. मुळात त्यांचे ध्येय केवळ स्वत:ची उन्नती व ती सुद्धा स्वत:चा मठ संप्रदाय निर्माण करण्यात असल्याने पायामाध्येच गडबड आहे. अर्थात यालाही आक्षेप नसता जर यांनी आपली मर्यादा ओळखून आचरण केले असते. परंतु ज्या समाजात राहायचे तेथील व्यक्तींशी, त्यांच्या सुख: दु:खाशी आपली नाळ जोडली असली पाहिजे. अन्यथा समाजात राहून जो सन्याशी केवळ मठ व शिष्य यांच्यात रमला त्याना धर्म तत्वांचे व्यवस्थित आकलन झालेच नाही असे समजावे. जर असे नसते तर त्यानी सर्व सामान्यासाठी आध्यात्मिक मार्गदर्शन केले असते. आपल्या आजूबाजूला स्तुतीपाठकांचा घोळका त्याना आवडला नसता व खरा कर्मयोग आचरला असता. त्यामुळे अशा प्रकारच्या धर्माचार्यांनी कितीही आवाहन केले तरी त्यांचा समाजमनावरील प्रभाव हा शून्यच राहणार आहे.

वारकरी संप्रदायात संताविषयी अत्यंत स्पष्ट चित्र आहे.

ऐसी कळवळयाची जाती | करी लाभाविण प्रीती

संताना सामान्य जणांकडून कसल्याही लाभाची अपेक्षा नसते. त्यांच्या कल्याणासाठी ते सदैव मार्गदर्शन करत असतात. अनेकवेळा तर त्याना समाजाची उपेक्षाच सहन करावी लागते. अशी उपेक्षा सहन करूनही ते आपले कार्य सोडून देत नाहीत. दीन जणांच्या सेवा करण्यात त्याना

दु:खमुक्त करण्यातच ईश्वराची खरी सेवा आहे याची त्याना खात्री असते. खऱ्या संतांच्या जीवन चरित्रात कुठेच आध्यात्मिक ज्ञानाचा काटेरी दंभ आढळत नाही. तेव्हा सामान्यजन त्यांच्यावर श्रध्दा ठेवून सद्व्वर्तनाकडे प्रवृत्त होत असतील, त्यांच्या अस्वस्थ मनाला क्षणभर विश्रांती मिळत असेल तर धर्माचार्यांनी संतांचा सन्मान केलाच पाहिजे. संत हे सामान्यजणांच्या वृतीत सकारात्मक बदल घडवू शकतात. एका अर्थाने त्याना देवाच्या जवळ नेणारे आहेत म्हणून त्याना देवाच्याही अगोदर वंदन केले पाहिजे. संत कबीरांच्या शब्दात सांगायचे तर

गुरु गोबिंद दोनो खडे काके लागू पाय

बलिहारी गुरु की जिन्ह गोबिंद दिनो दिखाय

तेव्हा देव की संत अशा प्रकारचे बुद्धीभ्रम करणारे वक्तव्ये करणे हे धर्माचार्याचे काम नाही. त्यांनी शब्द पांडित्य माजवून स्वत:ची पाठ थोपटून घेण्यात कसलाही परमार्थ नाही. शब्द ज्ञानाचा वृथा अभिमान बाळगून त्या चैतन्य स्वरूपाची प्राप्ती होणे कधीच शक्य नाही.

व्यक्तींचे जगणे समृद्ध करणारी, त्याला सात्विक अर्थ प्राप्त करून देणारी व त्याच्यामधील मनुष्यपण जिवंत ठेवणारी ‘जीवन जगण्याची कला’ अंगी बाळगणारे व ती सामान्यजनाना शिकवणारे संत समाजाला हवे आहेत.

(हा लेख साप्ताहिक लोकप्रभा मध्ये प्रसिध्द झालेला आहे )

# राजकारणातील लोकानुनय

लोकांनी, लोकांकरिता लोकांच्यासाठी निर्माण केलेल्या शासनव्यवस्थेला आपण लोकशाही असे म्हणतो. परंतु ज्या लोकानाकारीता ही व्यवस्था आहे ते खरेच प्रगल्भ झाले आहेत का? अथवा नेतृत्वाकडून तसे प्रयत्न झाले आहेत का? असा प्रश्न विचारला गेला तर त्याचे उत्तर निराशादायकच असेल. उलटपक्षी नेतृत्व निर्माण व्हावे यासाठी काही मंडळी लोकसमूहाला तात्कालिक फायदा होऊ शकणाऱ्या मागण्या मान्य करून घेण्याच्या प्रयत्नात असल्याचे अत्यंत दुर्दैवी चित्र देशासमोर वारंवार दिसत आहे. वेगवेगळया लोकसमूहाच्या मागण्या व त्यासंबंधी नाराजी ओढवून न घेण्याचे नेतृत्वाचे धोरण बघितले तर याची प्रचीती यावी. याप्रकारच्या गलीछच राजकारणाचा कळस म्हणजे एखाद्या लोकसमूहाची सहानुभूती मिळवण्यासाठी नेत्यांची बेजाबदार बेताल वक्तव्ये. खरे दुःखणे हे आहे की, अशावेळी समाजातून प्रखर विरोध होत नाही. वास्तविक स्वातंत्र्यानंतर आपल्याला अत्यंत व्यापक दूरदर्शित्व असणाऱ्या नेतृत्वाची गरज होती. आपण नेतृत्वाने व्यापक द्रृष्टीकोन ठेऊन लोकमानसाला प्रगल्भ, प्रशिक्षित बनवणारी सक्षम व्यवस्था, संस्था निर्माण करणे गरजेचे होते. व्यवस्थेमध्ये असणारे मनुष्यबळ आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडत नाही. हे देशाच्या आजच्या विपन्नावस्थेचे एकमेव कारण आहे. असे नसते तर भ्रष्टाचाराचा आगडोंब एवढा उसळला नसता.

सामान्य व्यक्तीना, लोकसमूहांना तात्कालिक फायदा आकर्षित करतो. परंतु तात्कालिक फायद्यामुळे भविष्यात निर्माण होणार्या समस्याकडे त्यांचे लक्ष नसते. ही परिस्थिती नव्याने नेते होण्याची इच्छा असलेल्याना अत्यंत पूरक ठरते. म्हणून नेते अशा मागण्यांना पाठिंबा देतात. त्यांच्यासाठी रस्त्यावर उतरून आंदोलने करतात ते केवळ आपले 'राजकीय करियर'पक्के व्हावे या हेतुने. लोकसमूहाला मग आपल्या मागण्यांना पुढे नेणारा नेता आपला वाटू लागतो. अशावेळी सारासार विवेक मागे पडतो आणि उरतो तो फक्त लोकानुनय. यात त्या ना त्या लोकसमुहाचे भले होते ना समाजाचे. हा देश अशा लोकानुनयाचा अनेकवेळा साक्षीदार झालेला आहे किंबहुना ते ओझे अजूनही वाहतो आहे.

देश, समाजाच्या व्यापक हिताचा विचार करून नेतृत्वाने प्रसंगी कठोर भूमिका घेत तात्कालिक फायद्याच्या मागण्यांना प्रखर विरोध करायला हवा. परंतु कदाचित यासाठी आपल्याला लोकसमूहाचा रोष पत्करून आपले राजकीय भवितव्य धोक्यात येईल या भीतीने कोणताही नेता अशी भूमिका घेत नाही. परिणामी लोकसमूहाचा नेता आपले राजकीय वजन वाढवतो. अशा परिस्थितीत सर्वात क्लेशकारक असते ती समाजाचे बौद्धिक नेतृत्व करणाऱ्या वर्गाची निष्क्रियता. यात वकील, वैद्यकीय व्यावसायिक, प्राध्यापक, पत्रकार असा समाजाचा एक मोठा वर्ग जो की बौद्धिक म्हणून गणला जातो. त्याना या परिस्थितीचे आकलन नसते असे नाही तर त्यांचा अलिप्तपणा त्याना बांधून ठेवतो. त्यांच्या विचारावरून अनेक जन आपली मते ठरवत असतात. तेव्हा या वर्गाने देश आणि समाजहितासाठी आपले मतप्रदर्शन ठामपणे करणे हे कर्तव्यच आहे. परंतु बहुतेक वेळी हा वर्ग भूमिकाच घेत नाही आणि घेतलीच तर ती भूमिका लोकानुनयायीच असते किंवा आपल्या कुठल्याही व्यावसायिक हित संबधाला बाधा पोहोचू नये अशीच काळजी घेतली जाते. 'मी समाजाचे देशाचे काहीतरी देणे लागतो' ही भावना सामान्य नागरीकापेक्षा बौद्धिक वर्गाकडे अधिक प्रखर असायला हवी. परंतु दिसते असे की भूमिका तर सोडाच हा वर्ग किमान मतदानाकडेही पाठ फिरवतो. देशाप्रती आपल्याला काहीच वाटू नये हे खरे दुर्दैव आहे. या वर्गाने समाजहितैषी भूमिका मांडल्या तर लोकानुयायी मागण्या नक्कीच आधारहीन होऊ लागतील.

दुसरीकडे, समाजातील तरुण वर्ग आहे जो खऱ्या अर्थाने लोकानुयायी मागण्या पुढे रेटण्यासाठी नेत्यांकडून वापरला जातो. कारण तो प्रचंड भावनिक असतो. आपल्या मागण्या पूर्ण झाल्या की, आपल्या आयुष्यात नवे पर्व सुरु होईल या भाबड्या आशेवर तो जीव तोडून काम करतो. जसे की, मोफत संगणक वाटप, मोफत सायकल इ. तरुण वर्गाला आवश्यकता आहे ती कौशल्यावर आधारित शिक्षणाची व ते परवडनाऱ्या शुल्कात. असे शिक्षण दिले गेले तर मोठ्या प्रमाणावर स्वयंरोजगार निर्मिती होऊ शकते. पण असे झाले तर नेत्यांच्या मागे मागे फिरायला कार्यकर्ते राहणार नाहीत. म्हणून तरुणांना रोजगार इतकाच शब्द वापरला की टाळया.

आपल्याकडे लोकानुयायी नेतृत्व मोठे होतात त्याला सामान्य नागरिक तेवढाच जबाबदार आहे. नेत्याकडे जनता तेव्हाच जाते जेव्हा सनदशीर मार्गाने काम होत नसेल. बेकायदेशीर काम असले की नेत्यांकडे जायचे. नेते आपले राजकीय वजन वापरून सर्व बेकायदेशीर

कामे राजरोसपणे करून देतात हा ठाम विश्वास सर्व सामान्य जनतेला आहे. मग ते शाळा प्रवेश असो की इमारतीचे बांधकाम असो. सर्व बेकायदेशीर कामाना नेत्यांचा आसरा मिळू लागल्याने नेते लवकरच मोठे नेते होतात तर गुंड पोसले जातात. यातून किती मोठा भ्रष्टाचार होऊ शकतो आणि त्यात नेते आणी शासकीय अधिकारी किती संगनमताने भ्रष्टाचार करतात याचे अनेक उदाहरणे महाराष्ट्रात घडलेली आपण पाहिलेली आहेत. यातून निर्माण होणारी विषवल्ली समाजात आर्थिक असमानता, जातीय विद्वेष निर्माण करत आहे.

नेतृत्व, अधिकारी, कर्मचारी, आणि सामान्य नागरिक असे मनुष्यबळ निर्माण होते ते शिक्षण व्यवस्थेतून. खरे बदल इथे आवश्यक आहेत. शिक्षण व्यवस्थेत अत्यंत गांभीर्यपूर्वक दुरगामी परिणाम करणारे बदल हवे आहेत. सध्याच्या परिस्थितीत अत्यंत प्रभावी राजकीय इच्छाशक्ती असेल तरच असे बदल होऊ शकतील. आपल्याकडे शिक्षण क्षेत्रातील नामवंत तज्ञ आहेत त्यांच्या विद्वत्तेचा उपयोग करून व अत्याधुनिक तंत्रज्ञाचा वापर करून मनुष्यनिर्माण करणारी शिक्षणव्यवस्था आपण नक्कीच उभारू शकतो. जे चुकीचे आहे त्याला प्रखरतेने नाही म्हणणे व जे समाजाच्या हिताचे आहे त्याला तितक्याच ठामपणे हो म्हणणे व जमल्यास त्यासाठी प्रत्यक्ष कार्य करणे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे. आणि हे कर्तव्य पार पाडण्यास आपण चुकलो तर येणारी पिढी आपल्याला माफ करणार नाही.

(हा लेख दै. महाराष्ट्र टाईम्स औरंगाबाद आवृत्ती मध्ये प्रसिध्द झालेला आहे. )

# राजे आम्हाला माफ करा ....

आम्हाला याची पुर्ण खात्री आहे की, हे शब्द आपल्याला आवडणार नाहीत; परंतु तरीही आपल्यासमोर उभे राहिल्या नंतर खोटे बोलता येत नाही. रायगडावर चढताना प्रत्येक पाउलावर आपल्या अतुल्य शौर्याची, सामर्थ्याची जाणीव होत होती. कानामध्ये वीर रसाची स्फुर्तीगीते ऐकू येत होती. आपल्या शौर्याची जीवंत साक्षीदार असलेली, आपल्या पदस्पर्शाने पावन झालेली मातीतून एक वेगळाच दिव्य स्पर्श जाणवत होता. डोळ्यासमोर पराक्रमी योध्यांच्या युद्धप्रसंग सहज दिसू लागत होते. कडे कपारीतून 'हर हर महादेव' ही गगनभेदी गर्जना घुमत होती. मावळयांच्या अतुल्य त्यागाचे, निष्ठेचे प्रसंग ऐकून वारंवार उर भरून येत होता. मनाच्या अशा अवस्थेत राजे तुमच्या सिंहासनासमोर उभे राहिलो अन आपल्याला मुजरा करताना आयुष्याचे सार्थक झाल्यासारखे वाटले. परंतु लगेचच देदीप्यमान भूतकाळातून अस्वस्थ्य करणारे वर्तमानाचे भान आले तत्क्षणी स्वत:चीच लाज वाटली. वर्तमानातील काळोखाने श्वास गुदमरून गेला. आणि अत्यंत अपराधी भावनेने आपल्या समोर नतमस्तक होऊन अश्रूना वाट मोकळी करून दिली. आवंढा गिळत बोलण्याचा प्रयत्न करत होतो. शेवटी अडखळत का होईना एकच वाक्य बोलू शकलो 'राजे आम्हाला खरच माफ करा'.

आम्ही स्वराज्याचे वारसदार गलित गात्र झालो आहोत की काय अशी शंका येते. सर्व जाती-जमाती तील मावळयाना आपण एकत्र केलेत त्याना स्वराज्यासाठी लढण्यास प्रवृत्त केलेत. राजे मराठी रयतेतील जाती-जाती मधील भांडणे बघून काळजाला तीव्र वेदना होतात. आपण

आम्हाला स्वाभिमान शिकवला. आमचे नेते मात्र सत्तेच्या मोहापायी वारंवार स्वाभिमान विकताना दिसतात. राजे गनीम आता शस्त्राने नाही तर बुद्धीभ्रम पसरवत हल्ला करत आक्रमण करत आहे. आमच्या नेत्यांना सत्तेच्या मोहात अडकवून मराठी रयतेत जाती-जाती मध्ये वितुष्ट निर्माण करून आपला डाव साधत आहे. दुर्दैव म्हणजे आम्ही सुध्दा अत्यंत स्वार्थी झालो आहोत. स्वराज्यासाठी काही त्याग करण्याचे तर दूरच राहो, आम्हाला स्वराज्याची प्रतिष्ठा असणारे गडकिल्ले यांचे जतन करणे सुध्दा आवश्यक वाटत नाही. तळपायाची आग मस्तकात जाते जेव्हा गडकील्लॆ हे पिकनिक स्पौट बनून जातात, स्वराज्याच्या या जिवंत स्मारकावर अलीकडील प्रेमवीर स्वतःची नावे लिहितात. परंतु आम्ही इतके दुबळे झालो आहोत की आमच्या रागाला, संतापाला काहीच अर्थ उरला नाही.

स्वराज्याचे वारसदार आम्ही अत्यंत बेजबाबदार झालो आहोत की काय अशी शंका वारंवार उत्पन्न होते. नव्या पिढीमध्ये स्वराज्याचा अभिमान रुजवण्याचे आम्हाला काहीच महत्व वाटत नाही. खरेतर आपल्या प्रेरणादायी चरित्राचा घरा-घरात किमान परिचय व्हायला हवा त्याऐवजी कार्टून, व्हिडिओ गेमच्या खोल दरीत आम्ही आमच्या पाल्यांना ढकलून देत आहोत. शारीरिक संपत्ती कमावण्यास प्रोत्साहन देणे आम्हाला महत्वाचे वाटत नाही. देशाच्या भल्या बुऱ्याचा विचार करणे आम्हाला निरर्थक वाटते. आमच्या तरुणाईला व्यसनाधीन होण्यात, प्रेयसी बरोबर फिरण्यात, शरीर सुख मिळवण्यात आयुष्याची सार्थकता वाटते आहे. शरीर प्रदर्शन म्हणजेच केवळ स्वातंत्र्याची अभिव्यक्ती असल्याची बालिश मनोधारणा मान्यता पावत आहे. डोक्यात झिणझिन्या येतात जेव्हा एखाद्या बारसमोर उभे असलेल्या चारचाकी वर आपला फोटो असतो. काही कर्तुत्व गाजवण्याऐवजी जाहिरातबाजी व आत्मप्रौढी आम्हा लोकाना अधिक आवडू लागली आहे. खा, प्या व मजा करा असे आचरण शिकवणारी अवदसा मराठी रयतेत उत्तरोतर रुजू पाहत

आहे. राजे, खरे सांगायचे तर आम्ही केवळ स्तुतिपाठक झालो आहोत. आम्हाला जयजयकार करायला आवडतो. परंतु स्वराज्यासाठी स्वत:च्या आचरणात बदल घडवून आणणे, उत्तम चारित्र्य निर्माण करणे, व्यसनापासून परावृत्त होणे, इतराना परावृत्त करणे, अन्यायाला वाचा फोडणे, लोककल्याणासाठी निरपेक्ष हेतूने विधायक कार्य करण्याचे कष्ट घेणे आम्हाला नकोसे वाटते. स्वराज्याच्या रक्षणासाठी आम्ही आपापसातील मतभेद मिटवू शकत नाही. याउलट गनीमाच्या फोडा आणि राज्य करा या नीतीला बळी पडतो आहोत. राजे थोडक्यात सांगायचे तर आमच्या संवेदना मेल्या आहेत. स्वदेश, स्वसंस्कृती यांच्या विषयीची बांधिलकी झाडाच्या वाळलेल्या पानाप्रमाणे झाली आहे.

राजे, अशा या भयान वास्तवाचे कथन करताना हृदयाला पीळ पडत आहे. परंतु अजुनही विश्वास आहे की, आपल्या वास्तवाने पुनीत झालेली ही गड- किल्ल्यावरील मातीच मराठी रयतेची या ग्रहणातून लवकर सुटका करेन. भव्य-दिव्य अशा इतिहासातून प्रेरणा घेऊन वर्तमानात स्वकर्तृत्वाने पराक्रम गाजवण्यासाठी व स्वराज्याची गगनचुंबी पताका उभारण्यासाठी शक्ती, स्फूर्ती या जिवंत स्मारकातुनच मिळेल. याकरिता गडकिल्ल्यांचा सांभाळ आम्ही मंदिराप्रमाणे करायला हवा. आपल्या परम-प्रतापी चरित्रातून प्रेरणा मिळावी व मराठी रयतेने पुन्हा एकदा आपले गमावलेले तेज प्राप्त करण्यास प्रवृत्त व्हावे. शरीर संपत्ती, नैतिक मुल्यांचे मजबूत संस्कार, उज्ज्वल चारित्र्य, अतुट स्वामीनिष्ठा, स्वराज्य, स्वसंस्कृती चा स्वाभिमान या गुणांनी आजची तरुणाई समृध्द होवो. आमच्या प्रयत्नाना आपल्या आशीर्वादाचे बळ मिळो हीच आपल्या चरणी प्रार्थना.

# ई साहित्य प्रतिष्ठान

मित्रहो , सहजासहजी काहीच मिळत नाही. न आरोग्य न धन न संपदा. काहीही मिळवायचं तर संघर्ष आणि श्रम करावेच लागतात. “गोलमाल” करून, मेकओव्हर सर्व काही मिळवता येतं असा गैरसमज माध्यमांद्वारे सर्वत्र पसरवला जात आहे. झटपट श्रीमंती, आठ दिवसांत गोरेपणा, महिन्याभरात लांबसडक केस, एक हनुमान यंत्र गळयात बाधले की आजारांपासून मुक्ती अशा जाहिराती माथी मारल्या जात आहेत. अशा वेळी अशी पुस्तकं वाचून माणूस “जमिनीवर” येतो. फुकट काहीच मिळत नसतं. प्रत्येक गोष्टीसाठी कुणाला न कुणाला कष्ट पडतात. कधी आपल्याला, कधी आपल्या आईवडलांना, गुरूंना, तर कधी समाजातील इतरांना.

ई साहित्य प्रतिष्ठानची पुस्तकं विनामूल्य मिळतात. पण ती लिहिण्यासाठी लेखकांचे कष्ट व बुद्धी लागलेले असतात. आणि या एकेका पुस्तकाची किंमत म्हणुन लेखक हजारो लाखो रुपये मिळवू शकतात. पण मराठी वाचकांना विनामूल्य पुस्तकं मिळावी, व मराठीत वाचन संस्कृती वाढावी म्हणून असंख्य लोक प्रयत्न करीत आहेत. या प्रयत्नांत ई साहित्य प्रतिष्ठान व हे सर्व लेखक सहभागी आहेत. आपण या अभियानात सहभागी झालात का?

आपण ई साहित्य प्रतिष्ठानचे VIP सभासद झालात का?

VIP सभासद बनणं अगदी सोप्पं आहे.

आपल्या ओळखीच्या दहा मराठी लोकांचे मेल आय डी कळवा आणि बना VIP सभासद.

एका दमात तीन कामं.

1. पहिलं म्हणजे तुम्ही VIP सभासद बनता. तुम्हाला ई साहित्य प्रतिष्ठानचं पुस्तक ई मेलवर सर्वात आधी मिळतं. त्यांच्या कार्यक्रमाचं आमंत्रण मिळतं. त्यांच्या योजनांची माहिती मिळते. त्यांच्या कामात स्वतः सहभागी होण्याची संधी मिळते.

2. ज्या दहा किंवा अधिक मित्रांना तुमच्यामुळे फ़्री पुस्तकं मिळतात ते खुश होतात. त्यांना त्यांच्या आवडीची पुस्तकं मिळाली की ते इतर लोकांना तुमच्याबद्दल सांगतात. त्यांच्यासाठी तुम्ही म्हणजेच ई साहित्यचे प्रतिनिधी बनता.

3. यातून तुम्ही मराठी भाषेच्या संवर्धनाला अमूल्य असा हातभार लावता. आमचा उद्देश आहे मराठीतल्या सहा कोटी साक्षरांना वाचक बनवणं. आणि हे लक्ष्य साध्य करणं हे केवळ आणि केवळ मराठी लोकांना त्यांच्या भाषेवर असलेल्या प्रेमातूनच शक्य आहे. आपल्या भाषेचं राज्य व्हावं म्हणून १०६ हुतात्मे झाले. आपल्या भाषेनं राजा व्हावं म्हणून आपण एक दहा-वीस ई मेल आयडी देणारच ना! वाचनाची आवड असो वा नसो. फ़क्त मराठी साक्षर अशा दहा लोकांचे ई मेल पत्ते पाठवा. त्यांना वाचनाची आवड आपोआप लागेल. आपणच लावू. लावूच लावू. करूनच दाखवू.

आहे ना : एक दम : तीन कामं.

संपर्क साधा : esahity@gmail.com

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. त्यामुळे आपले मित्र आपल्यावर खुश होतील. शिवाय आम्ही ही खात्री देतो की या ई मेल्सचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल. इतर कसल्याही जाहिराती पाठवून त्यांना त्रास दिला जाणार नाही. तेव्हा लवकरात लवकर आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.

अधिक माहितीसाठी, आम्ही कोण ते जाणून घेण्यासाठी एकदातरी www.esahity.com या वेबसाईटला भेट द्या.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र

टीम ई साहित्य प्रतिष्ठान

